



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक २२६ * नांदेड * मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# तीन मंत्र्यांनी घेतली जरांगे पाटील यांची भेट

## कुणबी प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करणाऱ्यांची चौकशी करणार –विखे पाटील



**२९ ऑगस्ट रोजीपासून आंदोलन होणारच –जरांगे**

२९ ऑगस्टपासून मनोज जरांगे पाटील यांचे आंतरवाली सराटीत आंदोलन होणार आहे. ज्या नोंदी शोधल्या आहेत, त्या सर्वांची प्रमाणपत्र २८ ऑगस्टच्या आतमध्ये सरकारनं द्यावी अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली आहे. आता आंदोलन थांबणार नाही, २९ ऑगस्टला आंदोलन होणार असल्याचे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील म्हणाले.

**जालना (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणासंबंधी राज्य शासनाने आदेश दिले आहेत, मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही, अशी स्पष्ट कबुली राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. काही अधिकारीच सरकारला बदनाम करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचंही विखे पाटील म्हणाले. यापुढे ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना प्रमाणपत्र देण्यामध्ये कुणी जाणिवपूर्वक टाळाटाळ करत असेल तर त्याची चौकशी केली जाणार, अशी माहिती राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले.

राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत, शंभुराज देसाई, आमदार प्रसाद लाड यांच्या शिष्टमंडळाने आंतरवली सराटीमध्ये जाऊन मनोज जरांगे यांची भेट घेतली. मराठा आरक्षणावर राज्य सरकारची भूमिका नेमकी काय याची माहिती त्यांनी जरांगे यांना दिली.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणासंबंधी समाजाच्या मागण्या मान्य होत आहेत, पण त्याची अंमलबजावणी होत नाही हे दुर्दैव आहे. या प्रकरणात प्रशासनातील काही झारीतील शुक्राचार्य कार्यरत असून त्यांचा बंदोबस्त झाला पाहिजे. दाखले देण्यात जाणिवपूर्वक टाळाटाळ होत असेल तर त्याची चौकशी केली जाईल. पुन्हा असे प्रकार होणार नाहीत याची काळजी घेऊ.

दाखल्यांमध्ये विलंब आणि विसंगती यामुळे मराठा समाजात रोष आहे. या प्रक्रियेत काही अडचणी येत आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांना सवलती मिळत नाही. त्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबावर होत आहे. परंतु शासनाला बदनाम करण्याची भूमिका काही अधिकारी घेत आहेत. या सगळ्याची गंभीर दखल ही मुख्यमंत्र्यांनी घेतली आहे. पुन्हा असे प्रकार घडणार नाही याची काळजी घेऊ, असं विखे पाटील म्हणाले.

# सीजेपीची पुन्हा दिल्लीत धडक, शिक्षक दिनीच इंडिया गेटपासून मोर्चा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नीट पेपरफुटी आणि परीक्षांच्या मुद्द्यांवरुन दिल्लीच्या जंतरमंतरवर कॉकरोच जनता पार्टीने बेमुदत आंदोलन केल्यानंतर अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यावेळी, केंद्र सरकारच्यावतीने सीजेपीला काही आश्वासनं देण्यात आली होती. संबंधित आंदोलनावेळी विद्यार्थ्यांवर दाखल गुन्हे मागे घेण्याचंही आश्वासन देण्यात आलं. मात्र, सरकारने आश्वासन पाळलं नसल्याचे सांगत सीजेपी पुन्हा एकदा आंदोलनाच्या तयारीत आहे. दुसरीकडे सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी स्कुल ठीक करो अभियान सुरू केलं असून सरकारची शाळांची दूरवस्था पाहून संताप व्यक्त केला आहे. त्याच पार्श्वभूमीवर आता सीजेपीने ५ सप्टेंबर म्हणजेच शिक्षक दिनी आंदोलनाची घोषणा केली आहे.

सीजेपीकडून ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत शांततापूर्ण मोर्चाची घोषणा करण्यात आली असून २५ जुलैला सरकारने दिलेली आश्वासने पाळली नसल्याचे उगझ ने म्हटलं आहे. त्यामुळे, इंडिया गेटपासून नवी दिल्ली पोलीस मुख्यालयापर्यंत कॉकरोच जनता पार्टीच्यावतीने मोर्चा काढण्यात येणार आहे. छएएढ पीडितांच्या कुटुंबीयांसह पोलिसांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या, पोलीस अत्याचाराचे पीडित कुटुंबीय या मोर्चाचे नेतृत्व करणार आहे. १८ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयाने एफआयआरची यादी मागूनही सरकारने स्पष्ट आश्वासन दिले नसल्याचा दावा सीजेपीच्यावतीने करण्यात आला आहे.

# केंद्र सरकारने गव्हाच्या निर्यातीवर घातलेली बंदी उठवली



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** गव्हाच्या निर्यातीबाबत केंद्र सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. भारत सरकारने अनेक वर्षांनंतर गव्हाच्या निर्यातीवर घातलेली बंदी उठवली आहे. त्यामुळं आता भारतातून गव्हाची निर्यात आता पुन्हा सुरु होणार आहे. आता भाराताचा गहू इतर देशांमध्ये निर्यात होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान, सरकारच्या या निर्णयाचा शेतकऱ्यांना काय फायदा होणार आहे.

भारत सरकारने आता गव्हाच्या निर्यातीवरील बंदी उठवली आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा दुसऱ्या क्रमांकाचा गहू उत्पादक देश आहे. सरकारने काही वर्षांपूर्वी गव्हाच्या निर्यातीवर बंदी घातली होती. परकीय व्यापार महासंचालनालयाने जारी केलेल्या अधिसूचनेत हा निर्णय जाहीर करण्यात आला. सरकारने आता गहू, पीठ आणि इतर उत्पादनांच्या निर्यातीला मंजुरी दिली आहे. यापूर्वी, या वर्षी फेब्रुवारीमध्ये सरकारने गव्हाच्या मर्यादित खेपांना परवानगी दिली होती. दरम्यान, गव्हाच्या निर्यातीवरील बंदी उठवल्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. तर याचा फायदा भारतीय शेतकरी आणि निर्यातदारांनाही होईल असे सांगण्यात आले आहे.

सोमवारी जारी करण्यात आलेल्या या अधिसूचनेमुळे जागतिक गव्हाचा पुरवठा वाढू शकतो. शिवाय, गव्हासाठी इतर देशांवर अवलंबून असलेल्या देशांनाही यामुळे दिलासा मिळू शकतो. गहू उत्पादनात भारताचा दुसरा क्रमांक लागतो. देशातील गेल्या गव्हाच्या पिकाने १२०.६ दशलक्ष टनांचा विक्रमी उच्चांक गाठला आहे.

भारतात गव्हाचे उत्पादन नेहमीच चांगले राहिले आहे. असे असूनही, सरकारने २०२२ पासून मोठ्या प्रमाणावरील गहू निर्यातीवर बंदी घातली होती. २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर आक्रमण केले. यानंतर, देशात गव्हाची पुरेशी उपलब्धता आणि अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी भारत सरकारने निर्यातीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. आता सरकारने पुन्हा एकदा निर्यातीला परवानगी दिल्याने, आंतरराष्ट्रीय बाजारात गव्हाची मागणी आणखी वाढेल. याचा फायदा भारतीय शेतकरी आणि निर्यातदारांनाही होईल.

# मुंबईत 'मराठी सक्ती'विरोधात रिक्षाचालकांकडून तीन दिवस संप

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईत ऑटो, टॅक्सी आणि कॅब चालकांसाठी राज्य सरकारने मराठी भाषा अनिवार्य केली आहे. या निर्णयावरून नवा वाद पेटला आहे. मुंबईतील काही चालकाने मराठी बोलण्यास नकार दिलाय. राज्य सरकारकडून मराठी न बोलणाऱ्या रिक्षा चालकावर कारवाईचा बडगा उगारला आहे. मराठी सक्तीच्या नियमाला विरोध करत शहरातील रिक्षाचालकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. मुंबईतील रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी ३ दिवसांचा संप पुकारला आहे.

# नांदेडमध्ये 'सनातन धर्म मुर्दाबाद' घोषणेने धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप; काँग्रेस कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)–** काँग्रेस पक्षाच्या सत्याग्रह आंदोलनादरम्यान कथित आक्षेपार्ह घोषणा देऊन हिंदू धार्मिक भावना दुखावल्याच्या आरोपावरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष तथा नगरसेवक अब्दुल गफार, नगरसेवक मुन्ना अब्बास, प्रसेनजीत वाघमारे व इतरांविरुद्ध भारतीय न्याय संहिता मधील कलम २९९, ३०२ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांना दिलेल्या फिर्यादीवरून तक्रारदार गणेश ओमप्रकाश कोकुलवार (वय ४४, रा. चौफाळा, नांदेड) हे मार्केट यार्ड येथील पीएमआय एजंट असून विश्व हिंदू परिषद, नांदेड जिल्हा महामंत्री असल्याचे नमूद आहे. त्यांनी २४ ऑगस्ट रोजी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

तक्रारीनुसार, १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे साडेपाच ते साडेसहा वाजेच्या दरम्यान नांदेड येथील आयटीआय चौकात काँग्रेस पक्षाचे सत्याग्रह आंदोलन सुरू होते. या आंदोलनादरम्यान काही आंदोलकांनी कथितरीत्या 'सनातन धर्म मुर्दाबाद, मनुवाद मुर्दाबाद' अशा घोषणा दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घोषणांचा व्हिडिओ फेसबुकवर पाहिल्याने आपल्या हिंदू धार्मिक भावना दुखावल्याचे तक्रारदाराने पोलिसांना सांगितले. संबंधित घोषणा देणाऱ्यांविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी २४ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता ऋखठ क्रमांक ०३७०/२०२६ नोंदविला असून, गुन्ह्याच्या तपासाची जबाबदारी पोलीस निरीक्षक राजेश अशोकराव पुरी यांच्याकडे देण्यात आली आहे.

# अमरावती अग्नितांडव: ३ बालकांचा दुर्दैवी अंत



**अमरावती (प्रतिनिधी)–** अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या (डफरिन रुग्णालय) नवजात शिशु अतिदक्षता विभागात सोमवारी पहाटे भीषण आग लागली. पहाटे ३:३० वाजेच्या सुमारास व्हेंटिलेटरच्या स्फोटाने ही आग लागली. या काळीज पिळवटून टाकणाऱ्या दुर्घटनेत ३ नवजात बालकांचा धुरामुळे गुदमरून दुर्दैवी मृत्यू झाला. तर, प्रशासनाने आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी तातडीने हालचाली करत इतर ३६ चिमुकल्यांना या आगीच्या तावडीतून सुखरूप बाहेर काढले आहे.

३६ बालकांना तातडीने इतर रुग्णालयांत हलवले. सुरक्षित बाहेर काढण्यात आलेल्या बालकांना उपचारासाठी तातडीने शहरातील विविध शासकीय आणि खाजगी रुग्णालयांत हलवण्यात आले आहे.

घटनेची गंभीर दखल घेत अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, खाजगी आणि सरकारी रुग्णालयांत हलवण्यात आलेल्या सर्व बालकांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च राज्य सरकार करणार असून पालकांकडून एकही रुपया घेतला जाणार नाही.

या घटनेनंतर तात्काळ पोलीस आणि फॉरेन्सिक टीमने घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. रुग्णालयाला उपकरणांचा पुरवठा करणाऱ्या 'शिलर' कंपनीच्या नागपूर येथील पुरवठादारांना तातडीने बोलावण्यात आले असून, उपकरणांच्या तांत्रिक बिघाडाची चौकशी केली जात आहे.

# केरळच्या केझिया लिझ मेजोने पटकावला 'मिस युनिव्हर्स इंडिया २०२६'चा किताब




**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** केरळची सौंदर्यवती केझिया लिझ मेजो हिने 'मिस युनिव्हर्स इंडिया २०२६'चा प्रतिष्ठित किताब पटकावला आहे. २३ ऑगस्ट रोजी जयपूरमध्ये या स्पर्धेचा भव्य अंतिम सोहळा पार पडला. देशभरातील स्पर्धकांनी सौंदर्य, आत्मविश्वास, बुद्धिमत्ता, संभाषण कौशल्य आणि नेतृत्वगुणांचे प्रदर्शन केले.

केझियाने आपल्या आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्वाने आणि उत्कृष्ट कामगिरीने परीक्षकांची मने जिंकत विजेतेपदावर नाव कोरले. तामिळनाडूची वैष्णवी गणेश प्रथम उपविजेती, तर गुजरातची अनुश्री सातवलेकर द्वितीय उपविजेती ठरली.

'मिस युनिव्हर्स इंडिया २०२६'चा मुकुट जिंकल्यानंतर केझिया लिझ मेजो आता आंतरराष्ट्रीय 'मिस युनिव्हर्स' स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. भारताची विविधता, संस्कृती आणि नव्या पिढीचा आत्मविश्वास जगासमोर मांडण्याची इच्छा तिने व्यक्त केली.

# जनावरांच्या गोठ्यात 'अंदर-बाहर' जुगार; बिलोली पोलिसांनी टाकली धाड

## सहा जणांना पकडले, पावणे दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कासराळी शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर बिलोली पोलिसांनी छापा टाकून ६ जणांना रंगेहाथ ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल फोन, मोटारसायकली व जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ७३ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी प्रभारी अधिकारी, पो.स्टे. बिलोली यांना गुप्त बातमीदाराकडून गोपनीय माहिती मिळाली की, कासराळी शिवारातील शेख जावेद शेख सलीम यांच्या शेतातील जनावरांच्या गोठ्यात मोकळ्या जागेत काही व्यक्ती गोलाकार बसून 'अंदर- बाहेर' नावाचा पैशांवर जुगार खेळत व खेळवत आहेत.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने दोन पंचांना सोबत घेऊन सायंकाळच्या सुमारास सदर ठिकाणी अचानक छापा टाकला असता, सहा इसम जुगार खेळताना मिळून आले. ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे पिराजी मारोती चरकुलवार (वय ४५ वर्षे, रा. कासराळी, ता. बिलोली), मन्सूर सुलेमान शेख (वय ३८ वर्षे, रा. कासराळी), निळकंठ माधवराव गंगलोड (वय ४२ वर्षे, रा. कासराळी), कैलास मसनाजी सूर्ये (वय ४० वर्षे, रा. कासराळी), चंद्रकांत हणमंत बोडगे (वय ५० वर्षे, रा. कासराळी), शेख जावेद शेख सलीम (वय ३७ वर्षे, रा. कासराळी) अशी आहेत.

त्यांच्या ताब्यातून व घटनास्थळावरून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल रोख रक्कम ८ हजार ९७०, विविध कंपन्यांचे ६ मोबाईल हँडसेट (अंदाजे किंमत ५० हजार), ३) ३ मोटारसायकली – एमएच १२ जीपी २०४८ (किंमत ३५ हजार), एमएच १२ क्यूझेड ३९३६ (किंमत ४० हजार), एमएच २६ क्यू ३६७१ (किंमत ४० हजार), जुगाराचे साहित्य (पत्ते) असा एकूण १ लाख ७३ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सुरेश दत्ता वनशेट्टे यांच्या फिर्यादीवरून वरील ६ आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन बिलोली येथे गुन्हा रजि. नं. १८७/२०२६, कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास बिलोली पोलीस करत आहेत.


अवैध जुगार, मटका तसेच इतर बेकायदेशीर प्रकारांविरुद्ध पोलिसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. नागरिकांनी अशा प्रकारच्या अवैध हालचालींची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन नांदेड जिल्हा पोलिसांकडून करण्यात येत आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने, पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि तिडके, पोउपनि लोखंडे, पोलीस अंमलदार शिंदे, सुरेश वनशेट्टे व अंबुरे यांच्या पथकाने पार पाडली.

# जिल्हाधिकाऱ्यांनी साखरेच्या गोडाऊनची तपासणी करावी

## राजू शेट्टींचं मोदींना पत्र

**कोल्हापूर (प्रतिनिधी)–** देशभरात वाढलेल्या साखरेच्या दरावरुन शेतकरी नेतेही आक्रमक झाले आहेत. कारण, एकीकडे दरवाढीने सर्वसामान्य ग्राहक संतापला असून दुसरीकडे दरवाढीचा शेतकऱ्यांना फायदा होत नसल्याने शेतकरीही चिडले आहेत. साखरेचं दर वाढले आहेत, त्याचा फायदा शेतकऱ्यांना झाला असता तर आम्हाला आनंद झाला असता. केंद्र सरकारने १० लक्ष टन साखर आयात करण्याचा निर्णय घेतला, आता आयात करण्यात आलेली साखर ऑक्टोबरमध्ये येणार, त्याच काळात साखर करखाने सुरू होणार, त्यामुळे दर कोसळणार, असे म्हणत केंद्र सरकारच्या धोरणावर शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी नाराजी दर्शवली आहे. जिल्ह्यातील गोडाऊनची तपासणी जिल्हाधिकाऱ्यांनी करावी. यामागणीचे पत्र राजू शेट्टी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना लिहिले आहे.




# गांधी विद्यालय परिसरात ड्रग्ज तस्करीचा पर्दाफाश

## स्कुटीसह १.४० लाखांचा मुद्देमाल जप्त, कोडीनयुक्त सिरपसह दोघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात अवैध अमली पदार्थ विक्रीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत अमली पदार्थ टास्क फोर्सने मोठी कारवाई केली आहे.

दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास, गांधी राष्ट्रीय हिंदी विद्यालय, नांदेड रोडवर दोन जण संशयास्पदरित्या आढळून आले. त्यांची नावे धर्माजी भिवा दुधाडे, वय ३५ वर्षे, रा. बालाजीनगर, हिंगोली नाका, नांदेड (मूळ गाव आमदरी, ता. भोकर) व मोहम्मद मुनवर अन्सारी युसुफोद्दीन अन्सारी, वय २३ वर्षे, रा. तुराब उल हक नगर, दर्गा रोड, परभणी अशी आहेत.

हे दोन्ही आरोपी नशेकरिता वापरले जाणारे व एनडीपीएस कायद्यांतर्गत अनुसूचीमध्ये नमूद असलेले Triprolidine Hydrochloride आणि Codeine Phosphate घटक असलेल्या औषधी सिरपच्या बाटल्या संगनमत करून विना परवाना स्वतःच्या आर्थिक लाभासाठी बेकायदेशीररित्या विक्री व खरेदी करण्याच्या उद्देशाने बाळगून असल्याचे आढळून आले.




पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून १०० औषधी सिरपच्या बाटल्या (किंमत ५० हजार रुपये), टीव्हीएस स्कुटी क्र. एमएच–२६–सीएम–५६६६ (किंमत ७० हजार रुपये) व दोन मोबाईल फोन (किंमत २० हजार रुपये) असा एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी अमली पदार्थ टास्क फोर्सचे सपोउपनि हनुमंत मानेजी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४२६/२०२६, कलम ८(सी), २१, २२(बी), २९ एनपीडीएस कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सपोनि कोरंटलू हे करीत आहेत.

# ईद–ए–मिलादुन्नबी मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहरातील वाहतूक मार्गात बदल

**नांदेड (प्रतिनिधी)–** ईद- ए- मिलादुन्नबी अनुषंगाने नांदेड शहरात बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. मिरवणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित राहण्याची शक्यता असल्याने शांतता व सुव्यवस्था तसेच वाहतूक सुरळीत राहण्यासाठी शहरातील काही मार्गांवरील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.

**वाहतुकीसाठी बंद असलेले मार्ग :** बर्की चौक ते जुना मोंढा या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद राहील. जुना मोंढा – देना बँक – महावीर चौक गांधी पुतळा – शिवाजी महाराज पुतळा – वजिराबाद चौक –कलामंदिर – शिवाजीनगर ते आयटीआय चौक – श्रीनगर – वर्कशॉप कॉर्नर या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद राहील. सिडको/हडकोकडून कोठा नाकामार्गे नवीन पुलावरून जुना मोंढ्याकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहील. रविनगर–जुना कौठा गोवर्धनघाट पुलावरून वजिराबाद चौकमार्गे वर्कशॉपकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहील.

**वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग :** बर्की चौकाकडून जुना मोंढ्याकडे जाणारी वाहतूक इतवारा बाजार – डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय – भंगार लाईन – गिट्टी क्रेशर चौक – बाफना टी पॉईंट रोडने जाण्यासाठी वापरता येईल. जुना मोंढा ते वर्कशॉप मार्गावरील वाहतूक अबचल नगर –यात्री निवास – अण्णाभाऊ साठे चौक – महादेव दाल मिल रोड नं. २६ ने ये–जा करतील. किंवा नाईक चौक टिळक नगर चौक – पिरबुऱ्हानमार्गे चैतन्यनगरकडे वळविण्यात येईल. वजिराबाद चौकाकडून श्रीनगरकडे जाणारी वाहतूक वजिराबाद चौक – तिरंगा चौक – पोलीस मुख्यालय कॉर्नर – लालवाडी अंडरब्रिज – शिवाजीनगर (पिवळी गिरणी) ते गणेशनगर वाय पॉईंटमार्गे वळविण्यात येईल. रविनगर–जुना कौठा–गोवर्धनघाट पुलावरून नांदेड शहरातून वर्कशॉपकडे जाणारी वाहतूक पोलीस मुख्यालय कॉर्नर – लालवाडी अंडरब्रिज शिवाजीनगर (पिवळी गिरणी) ते गणेशनगर वाय पॉईंटमार्गे वळविण्यात येईल.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# ‘वंदे मातरम’चा सन्मान झालाच पाहिजे!

‘वंदे मातरम’ या राष्ट्रीय गीताला आता राष्ट्रगीताचा दर्जा देण्यात आला आहे. या राष्ट्रगीतावरून भाजप आणि काँग्रेसमध्ये सुरू झालेला वाद हा दुर्दैवी आणि अनावश्यक आहे. स्वातंत्र्यलढ्यात देशवासीयांच्या मनात राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या या गीताचा सन्मान कोणत्याही एका पक्षाचा, विचारधारेचा किंवा जाती–धर्माचा विषय असू शकत नाही. ते संपूर्ण देशाचे आहे. त्यामुळे ‘वंदे मातरम’चा वापर राजकीय आरोप–प्रत्यारोपांसाठी करण्याऐवजी त्याचा सन्मान आणि राष्ट्रीय ऐक्याची भावना जपणे आवश्यक आहे. ‘वंदे मातरम’ला राष्ट्रगीताचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर त्याच्या सन्मानासंदर्भात शासनाने नियम व कायदेशीर तरतुदी केल्या आहेत. त्यामुळे त्या तरतुदींचे पालन करणे ही कोणत्याही एका पक्षाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिक, राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सार्वजनिक संस्थेचे कर्तव्य आहे. देशातील प्रत्येक जाती–धर्माच्या नागरिकांनी या कायद्याचा आणि राष्ट्रगीताचा समान आदर करणे अपेक्षित आहे. कायदा सर्वांसाठी समान असल्याने त्याचे पालनही सर्वांनी समानपणे केले पाहिजे आणि तसे न करणाऱ्याला कायद्यानुसार शिक्षा देखील झालीच पाहिजे. काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत २८ ऑक्टोबर १९३७ च्या ठरावाचा संदर्भ देत ‘वंदे मातरम’च्या पहिल्या दोन कडव्यांची परंपरा पुढे सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. काँग्रेसचे नेते या निर्णयामागे ऐतिहासिक संदर्भ असल्याचे स्पष्ट करीत आहेत. याचा अर्थ काँग्रेसने जे केले नाही ते आता कोणीही करू नये असा आहे का? किंवा काँग्रेसने जे केले तेच आम्ही करणार, असं त्यांचं म्हणणं आहे का? दुसरीकडे, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपने काँग्रेसच्या भूमिकेवर देशविरोधी असल्याचा आरोप केला आहे. काँग्रेसनेही भाजपवर राष्ट्रवादाचे राजकारण केल्याचा पलटवार केला आहे. या वादातून एक मूलभूत प्रश्न मात्र दुर्लक्षित होत आहे. राष्ट्रगीताबाबत कायदा आणि नियम अस्तित्वात असताना त्यांचे पालन करण्याची राजकीय पक्षांची तयारी किती आहे? त्यांनी त्याचे पालन का करू नये? संविधान, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा सन्मान हा राजकीय सोयीचा विषय होऊ शकत नाही. सत्ताधारी पक्षाने असो किंवा विरोधी पक्षाने, कायद्याच्या चौकटीतच आपली भूमिका मांडली पाहिजे. ‘वंदे मातरम’चा इतिहास केवळ राजकीय नाही; तो भारतीय स्वातंत्र्यलढ्याशी जोडलेला आहे. असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी या गीतातून प्रेरणा घेतली. त्यामुळे त्याचा सन्मान करणे म्हणजे एखाद्या पक्षाचा किंवा विशिष्ट समाजाचा पुरस्कार करणे नव्हे. त्याचवेळी कोणत्याही नागरिकाच्या धार्मिक भावना किंवा घटनात्मक अधिकारांकडे दुर्लक्ष करून सक्ती करणेही योग्य ठरणार नाही. कायदा नेमके काय सांगतो आणि त्याची अंमलबजावणी कशी करायची, याबाबत स्पष्टता ठेवूनच प्रशासनाने भूमिका घ्यावी. मात्र कायद्याने एखाद्या प्रसंगी राष्ट्रगीताच्या सन्मानाचे पालन बंधनकारक केले असेल, तर त्या कायद्याला आव्हान देण्याचा अधिकार कोणत्याही पक्षाला असू नये. कायद्याचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थेवर, पक्षीय ओळख न पाहता, नियमानुसार कारवाई झाली पाहिजे. राष्ट्रभक्तीचे प्रमाणपत्र एकमेकांना देण्याऐवजी राजकीय पक्षांनी राष्ट्रीय प्रतीकांचा सन्मान प्रत्यक्ष कृतीतून दाखविणे गरजेचे आहे. ‘वंदे मातरम’च्या निमित्ताने समाजात धार्मिक किंवा जातीय दरी निर्माण होऊ नये, याचीही काळजी घेतली पाहिजे. राष्ट्रगीत हे विभाजनाचे नव्हे, तर एकात्मतेचे प्रतीक ठरले पाहिजे. हे गीत कोणत्याही धर्माचा किंवा विचाराचा अपमान करणारे नाही, हे समजून घेणे देखील गरजेचे आहे. आज देशासमोर बेरोजगारी, महागाई, शेतीचे प्रश्न, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सलोखा यांसारखे अनेक गंभीर प्रश्न आहेत. त्यावर सरकार आणि विरोधकांनी विधायक चर्चा करणे आवश्यक आहे. ‘वंदे मातरम’सारख्या भावनिक विषयाचे राजकीय ध्रुवीकरणासाठी हत्यार बनविणे देशाच्या हिताचे नाही. राष्ट्रगीताचा सन्मान हा पक्षीय निष्ठेचा नव्हे, तर राष्ट्रीय कर्तव्याचा विषय आहे. कायदा झाला असेल तर त्याचे पालन सर्वांनी, सर्व पक्षांनी, सर्व जाती–धर्मांनी आणि प्रत्येक नागरिकाने केलेच पाहिजे.

# अर्थाचा शोध घेताना माणसाचा वेध घेणारे गंगाधर गाडगीळ



गंगाधर गोपाळ गाडगीळ यांचा जन्म २५ ऑगस्ट १९२३ रोजी मुंबई येथे झाला. गंगाधर गोपाळ गाडगीळ हे महाराष्ट्रातील एक बहुआयामी आणि प्रतिभावान व्यक्तिमत्त्व होते. ते अर्थतज्ज्ञ, प्राध्यापक, साहित्यिक, लेखक, समीक्षक आणि विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते. अर्थशास्त्राचा अभ्यास करताना त्यांनी केवळ पैसा, बाजारपेठ आणि आर्थिक व्यवहार यांचाच विचार केला नाही, तर त्यांचा सामान्य माणसाच्या जीवनावर होणारा परिणाम समजून घेण्याचा प्रयत्न केला. आर्थिक विकासाबरोबरच समाजातील माणसाचे सुख, गरजा आणि समस्या यांनाही महत्त्व दिले. त्यामुळे त्यांच्या कार्यात अर्थशास्त्रीय विचार आणि मानवी संवेदना यांचा सुंदर संगम दिसून येतो. मराठी साहित्याच्या क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान देऊन आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

शिक्षण पूर्ण केल्यानंतर गंगाधर गाडगीळ यांनी अर्थशास्त्राचे अध्यापन सुरू केले. त्यांनी विविध महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक म्हणून काम करताना विद्यार्थ्यांना अर्थशास्त्रातील संकल्पना सोप्या आणि प्रभावी पद्धतीने समजावून सांगितल्या. त्यांच्या मते, अर्थशास्त्र हे केवळ पुस्तकांपुरते मर्यादित नसून ते दैनंदिन जीवनाशी आणि समाजातील आर्थिक समस्यांशी जोडलेले आहे. त्यामुळे ते विद्यार्थ्यांना आर्थिक विषयांचा व्यावहारिक दृष्टिकोनातून विचार करण्यास प्रेरित करत. नरसी मोनजी कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्सचे ते पहिले प्राचार्य होते. त्यांच्या अध्यापनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक प्रश्नांकडे चिकित्सक आणि तर्कशुद्ध दृष्टीने पाहण्याची क्षमता विकसित झाली.

गंगाधर गाडगीळ यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध आर्थिक आणि सामाजिक समस्यांचा सखोल अभ्यास केला. आर्थिक विकास, नियोजन, औद्योगिकीकरण, सार्वजनिक क्षेत्र, रोजगार आणि ग्राहकांचे हक्क यांसारख्या विषयांवर त्यांनी महत्त्वपूर्ण विचार मांडले. त्यांच्या मते, देशाचा आर्थिक विकास म्हणजे केवळ राष्ट्रीय उत्पन्न किंवा उत्पादन वाढणे नव्हे, तर त्या विकासाचा फायदा समाजातील सामान्य आणि गरजू घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. आर्थिक धोरणे ठरवताना माणूस आणि त्याचे कल्याण केंद्रस्थानी असावे, हा त्यांच्या अर्थविचारांचा मुख्य आधार होता. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेकडे त्यांनी केवळ आकडेवारीच्या नव्हे, तर मानवी आणि सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले.

गंगाधर गाडगीळ यांनी अर्थशास्त्राशी संबंधित विविध विषयांवर महत्त्वपूर्ण आणि अभ्यासपूर्ण लेखन केले. ‘आर्थिक प्रश्न व अर्थरचना’ आणि ‘नियोजन आणि समृद्धी’ ही त्यांची उल्लेखनीय पुस्तके आहेत. या लेखनातून त्यांनी कठीण आर्थिक संकल्पना सामान्य वाचकांना सोप्या आणि सहज भाषेत समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. भारताच्या आर्थिक विकासासाठी नियोजन, योग्य आर्थिक धोरणे आणि संसाधनांचा योग्य वापर आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच आर्थिक विकासाचा विचार करताना समाजातील सामान्य माणूस, त्याच्या गरजा आणि सामाजिक परिस्थिती यांकडे दुर्लक्ष करता कामा नये, असा त्यांचा मानवी आणि वास्तववादी दृष्टिकोन होता.

गंगाधर गाडगीळ यांना ग्राहकांच्या हक्कांविषयी विशेष आस्था होती. बाजारपेठेत ग्राहक हा केवळ वस्तू खरेदी करणारा नसून त्यालाही काही मूलभूत अधिकार आहेत, याबाबत त्यांनी जनजागृती केली. ग्राहकांना वस्तूंची योग्य किंमत, अचूक वजन–माप, चांगली गुणवत्ता आणि योग्य सेवा मिळणे आवश्यक आहे, यावर त्यांनी भर दिला. व्यापारी आणि ग्राहक यांच्यातील व्यवहार न्याय्य, पारदर्शक आणि विश्वासार्ह असावेत, असा त्यांचा आग्रह होता. आर्थिक व्यवस्थेचा अंतिम उद्देश सामान्य माणसाचे जीवन अधिक सुखकर करणे हा असावा, म्हणून त्यांनी ग्राहकाला आर्थिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी मानले. त्यांच्या या विचारांमुळे ग्राहक जागृती आणि ग्राहक हक्कांच्या क्षेत्राला महत्त्वपूर्ण दिशा मिळाली.

गंगाधर गाडगीळ यांच्या आर्थिक विचारांमध्ये ग्रामीण समाज आणि सामान्य कामगारांचे प्रश्न यांना विशेष महत्त्व होते. भारतासारख्या देशाचा खरा विकास साधायचा असेल, तर ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत होते. त्यांनी ग्रामीण बेरोजगारी, गरिबी आणि आर्थिक विषमता या समस्यांकडे गांभीर्याने पाहिले. रोजगाराच्या माध्यमातून ग्रामीण जनतेचे उत्पन्न वाढून त्यांना आर्थिक स्थैर्य आणि आत्मनिर्भरता मिळू शकते, असा त्यांचा विश्वास होता. आर्थिक विकासाचा लाभ शहरांपुरता मर्यादित न राहता गावागावातील सामान्य माणसापर्यंत पोहोचला पाहिजे, हा त्यांच्या विचारांचा महत्त्वाचा भाग होता.

गंगाधर गाडगीळ यांनी केवळ शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रातच कार्य केले नाही, तर उद्योगक्षेत्राशीही त्यांचा जवळचा संबंध होता. त्यांनी विविध उद्योगांना आर्थिक आणि वित्तीय बाबींमध्ये सल्ला दिला. उद्योगांचा विकास, गुंतवणूक, वित्तव्यवस्था आणि योग्य आर्थिक निर्णय यांचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव होता. त्यामुळे त्यांच्या आर्थिक विचारांना केवळ सैद्धांतिक स्वरूप न राहता त्याला व्यावहारिक अनुभवाचीही जोड मिळाली. उद्योगांचा विकास करताना आर्थिक कार्यक्षमतेबरोबरच समाजाच्या आणि सामान्य माणसाच्या हिताचाही विचार केला पाहिजे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळे अर्थव्यवस्थेकडे त्यांनी सैद्धांतिक आणि व्यावहारिक अशा दोन्ही बाजूंनी पाहिले. अर्थशास्त्र आणि साहित्य यांचा संबंध गाडगीळ यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वात मोठी वैशिष्ट्यपूर्ण बाजू म्हणजे अर्थशास्त्र आणि साहित्य यांचा संगम. अर्थशास्त्राने त्यांना समाजाकडे तर्कशुद्ध आणि विश्लेषणात्मक दृष्टीने पाहायला शिकवले. साहित्याने त्यांना माणसाच्या भावना, संघर्ष आणि मानसिकता समजून घेण्याची संवेदनशील दृष्टी दिली. त्यामुळे त्यांच्या लेखनात आकडेवारीमागचा माणूस आणि आर्थिक समस्यांमागचे मानवी जीवन दिसून येते.

गंगाधर गाडगीळ यांच्या साहित्यिक आणि बौद्धिक योगदानाची राष्ट्रीय तसेच महाराष्ट्रातील साहित्यविश्वाने विशेष दखल घेतली. त्यांच्या उल्लेखनीय कार्यामुळे त्यांना अनेक मान–सन्मान प्राप्त झाले. ‘एका मुंगीचे महाभारत’ या आत्मचरित्रात्मक साहित्यकृतीसाठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. तसेच त्यांची मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली, हा त्यांच्या साहित्यिक कार्याचा मोठा गौरव मानला जातो. साहित्याबरोबरच अर्थशास्त्राच्या क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यामुळे साहित्यिक आणि अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी आपली स्वतंत्र व प्रभावी ओळख निर्माण केली. त्यांच्या कार्याचा मराठी साहित्य आणि आर्थिक विचारविश्वावर दीर्घकाळ प्रभाव राहिला.

गंगाधर गाडगीळ यांच्या विचारांमध्ये माणूस आणि समाज केंद्रस्थानी दिसतो. आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक विकासालाही महत्त्व दिले पाहिजे, असा त्यांचा विचार होता. त्यांनी ग्राहकांचे हक्क, ग्रामीण समाज, सामान्य जनतेच्या समस्या आणि आर्थिक विषमता यांकडे गांभीर्याने पाहिले. आर्थिक धोरणांचा समाजावर होणारा परिणाम त्यांनी चिकित्सक आणि तर्कशुद्ध दृष्टीने समजून घेतला. साहित्याच्या माध्यमातून त्यांनी मानवी मन, भावना आणि नातेसंबंध यांचा वेध घेतला. त्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये तर्कशुद्धता आणि मानवी संवेदनशीलता यांचा सुंदर समतोल दिसून येतो.

गंगाधर गाडगीळ यांच्या व्यक्तिमत्त्वातून आर्थिक प्रगतीसोबत मानवी आणि सामाजिक विकासाचे महत्त्व स्पष्ट होते. आर्थिक प्रगती म्हणजे केवळ पैसा, उत्पादन किंवा संपत्ती वाढणे नव्हे, तर समाजातील सामान्य माणसाचे जीवन अधिक सुखी आणि समृद्ध होणे हा विकासाचा खरा अर्थ आहे. शिक्षणाने माणसाला तर्कशुद्ध विचार करण्याची दृष्टी, तर साहित्याने माणुसकी आणि संवेदनशीलता दिली पाहिजे, असा त्यांच्या कार्यातून संदेश मिळतो. अर्थशास्त्र आणि साहित्य या दोन्ही क्षेत्रांत कार्य करून त्यांनी ज्ञानाच्या विविध शाखांचा सुंदर समन्वय साधला. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व आजही विचार करण्याची आणि समाजाकडे संवेदनशीलतेने पाहण्याची प्रेरणा देते.

गंगाधर गाडगीळ हे केवळ अर्थशास्त्राचे अभ्यासक नव्हते, तर समाज आणि माणूस समजून घेणारे संवेदनशील विचारवंत होते. त्यांनी अर्थव्यवस्थेचा अभ्यास करताना सामान्य माणसाच्या गरजा, समस्या आणि भावनांचा विचार केला. अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी आर्थिक व सामाजिक वास्तवाचा अभ्यास केला, तर साहित्यिक म्हणून माणसाच्या अंतर्मनाचा वेध घेतला. अर्थशास्त्र आणि साहित्य या दोन्ही क्षेत्रांतील त्यांच्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी ठरले. म्हणूनच अर्थाचा शोध घेताना माणसाचा वेध घेणारे गंगाधर गाडगीळ हे शीर्षक त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अत्यंत समर्पक ठरते.

**–डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८

# ‘हमको इंडियन बोलो!’ ईशान्य भारताला परके समजण्याची मानसिकता बदलली पाहिजे

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भाषा, वेशभूषा, खाद्यसंस्कृती, परंपरा, भौगोलिक परिस्थिती आणि चेहऱ्यापासून रंगरूपापर्यंत असंख्य विविधता भारताच्या ओळखीचा भाग आहे. मात्र, याच विविधतेकडे आपण एकात्मतेच्या नजरेने पाहण्याऐवजी कधी कधी पूर्वग्रहाच्या चष्म्यातून पाहतो, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. ईशान्य भारतातील नागरिकांना त्यांच्या चेहऱ्याच्या ठेवणीवरून ‘चिनी’ किंवा ‘परदेशी’ संबोधण्याची प्रवृत्ती हा केवळ विनोदाचा विषय नसून भारतीयत्वाच्या व्यापक संकल्पनेलाच धक्का देणारा गंभीर सामाजिक प्रश्न आहे.




अलीकडे सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका लहान मुलीच्या व्हिडिओने या प्रश्नाकडे संपूर्ण देशाचे लक्ष वेधले. ‘आम्हाला इंडियन बोला’ अशी तिची भावनिक विनंती अनेकांच्या मनाला चटका लावून गेली. आम्ही भारतीय आहोत, आम्ही इटानगरमध्ये राहतो, तरी आमच्या दिसण्यावरून आम्हाला चिनी का म्हटले जाते, असा तिचा सवाल आहे. एखाद्या निरागस मुलीला आपल्या देशातीलच नागरिकांनी आपण भारतीय आहोत हे सांगण्याची वेळ यावी, हीच आपल्या सामाजिक मानसिकतेसाठी आत्मपरीक्षणाची बाब आहे.

ईशान्य भारतातील अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा आणि सिक्कीम या राज्यांचा भारताच्या भौगोलिक आणि सांस्कृतिक रचनेत अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. या प्रदेशाने देशाच्या संरक्षणापासून क्रीडा, शिक्षण, कला, संगीत आणि प्रशासनापर्यंत अनेक क्षेत्रांत मोलाचे योगदान दिले आहे. सीमावर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन अनेकदा कठीण परिस्थितीतून जात असते. देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यात तेथील नागरिकांची भूमिका महत्त्वाची आहे. अशा नागरिकांना त्यांच्या रूपावरून परके ठरवणे म्हणजे त्यांच्या योगदानाचा आणि भारतीयत्वाचा अपमानच होय.

आपल्या देशातील एखाद्या व्यक्तीचे डोळे, चेहऱ्याची ठेवण किंवा त्वचेचा रंग आपल्या परिचयाच्या चौकटीपेक्षा वेगळा आहे म्हणून त्याला परदेशी समजणे ही अज्ञानातून निर्माण झालेली मानसिकता आहे. भारतीयत्वाला विशिष्ट चेहरा नाही. भारतीय असण्यासाठी एखाद्या ठरावीक पद्धतीचे दिसणे आवश्यक नाही. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातपासून अरुणाचल प्रदेशापर्यंत प्रत्येक नागरिक भारताचा समान नागरिक आहे.

विशेषतः महानगरांमध्ये शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायासाठी ईशान्येकडील राज्यांमधून मोठ्या संख्येने तरुण–तरुणी येतात. त्यांना त्यांच्या नावावरून, भाषेवरून किंवा चेहऱ्याच्या ठेवणीवरून हिणवले जाणे, त्यांची खिल्ली उडवली जाणे किंवा ‘चिनी’ म्हणून संबोधले जाणे ही अत्यंत वेदनादायक बाब आहे. एखाद्याला विनोद म्हणून केलेली टिप्पणी दुसऱ्याच्या मनावर किती खोल परिणाम करू शकते, याचा विचार आपण केला पाहिजे. सतत परकेपणाची जाणीव करून दिली गेल्यास त्या नागरिकांच्या मनात आपल्या देशाबद्दलच दुरावा निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणूनच अशा घटना किरकोळ समजून दुर्लक्षित करता कामा नये.

ईशान्य भारत हा भारताचा केवळ सीमावर्ती प्रदेश नाही; तो भारताच्या आत्म्याचा अविभाज्य भाग आहे. या प्रदेशातील लोकांची संस्कृती, लोककला, संगीत, नृत्य, हस्तकला, खाद्यपरंपरा आणि जीवनशैली भारताच्या सांस्कृतिक वैविध्याला अधिक समृद्ध करतात. त्यांच्या वेगळेपणाचा आदर करणे म्हणजे त्यांना वेगळे मानणे नव्हे; उलट त्यांच्या वैशिष्ट्यांसह त्यांना भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहात समान स्थान देणे होय.

गेल्या काही वर्षांत ईशान्य भारताच्या विकासाकडे केंद्र आणि राज्य सरकारांकडून अधिक लक्ष दिले जात आहे. रस्ते, रेल्वे, विमानसेवा, शिक्षण, डिजिटल कनेक्टिव्हिटी, पर्यटन आणि रोजगाराच्या संधी वाढवण्याचे प्रयत्न होत आहेत. ईशान्येकडील अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. क्रीडा क्षेत्रात या राज्यांतील तरुणांनी मिळवलेल्या यशामुळे संपूर्ण देशाला अभिमान वाटतो. कला, संगीत आणि सांस्कृतिक क्षेत्रातही ईशान्य भारताची स्वतंत्र ओळख आहे. ही ओळख भारताच्या व्यापक ओळखीला समृद्ध करणारी आहे.

मात्र केवळ विकासकामे करून प्रश्न सुटणार नाही. मानसिकतेत बदल होणे तितकेच आवश्यक आहे. ‘एक भारत, श्रेष्ठ भारत’ ही संकल्पना केवळ घोषवाक्य न राहता ती नागरिकांच्या वर्तनातून दिसली पाहिजे. शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये भारताच्या ईशान्येकडील राज्यांविषयी अधिक माहिती दिली पाहिजे. तेथील इतिहास, संस्कृती, समाजजीवन आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदान विद्यार्थ्यांना समजावून सांगितले पाहिजे. देशातील विविध प्रदेशांतील विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवली पाहिजे.

माध्यमे आणि सोशल मीडिया यांचीही या संदर्भात मोठी जबाबदारी आहे. एखाद्या व्यक्तीच्या दिसण्याची खिल्ली उडवणारे किंवा एखाद्या समाजसमूहाला परके ठरवणारे विनोद ‘मनोरंजन’ म्हणून प्रसारित होऊ नयेत. सोशल मीडियावर एखाद्या मुलीने आपल्या मनातील वेदना व्यक्त केल्यानंतर तिचे कौतुक करण्यापेक्षा त्या वेदनेमागचे कारण समाजाने समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

देशभक्ती म्हणजे केवळ राष्ट्रध्वजाला सलाम करणे किंवा राष्ट्रगीत म्हणणे नव्हे. देशभक्ती म्हणजे आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाचा सन्मान करणे. आपल्या शेजाऱ्याची भाषा वेगळी असली, त्याचा धर्म वेगळा असला, त्याची संस्कृती वेगळी असली किंवा त्याचा चेहरा आपल्या ओळखीपेक्षा वेगळा असला तरी तो आपलाच भारतीय नागरिक आहे, ही भावना मनात रुजवणे म्हणजे खरी देशभक्ती.

‘हमको इंडियन बोलो’ या एका लहान मुलीच्या शब्दांमध्ये त्यामुळे केवळ तिची व्यक्तिगत तक्रार नाही; तर संपूर्ण समाजाला विचार करायला लावणारा मोठा संदेश आहे. तिला किंवा ईशान्य भारतातील कोणत्याही नागरिकाला आपले भारतीयत्व सिद्ध करण्याची वेळ पुन्हा येऊ नये. त्यांच्या चेहऱ्यात आपल्याला परकेपणा नव्हे, तर भारताची विविधता दिसली पाहिजे.

भारताची खरी ताकद त्याच्या एकसारखेपणात नाही, तर विविधतेत एकता राखण्याच्या क्षमतेत आहे. त्यामुळे आता प्रश्न ‘तू कुठला दिसतोस?’ हा नसून ‘तू भारतीय आहेस, एवढेच पुरेसे नाही का?’ असा असायला हवा.

ईशान्य भारताला मुख्य प्रवाहात आणण्याची गरज नाही; कारण तो आधीपासूनच भारताच्या मुख्य प्रवाहाचा अविभाज्य भाग आहे. गरज आहे ती फक्त आपल्या मानसिकतेतील भिंती पाडण्याची. ‘हमको इंडियन बोलो’ ही एका मुलीची आर्त हाक भविष्यात कोणत्याही भारतीयाला द्यावी लागू नये, हीच खरी राष्ट्रीय एकात्मतेची कसोटी आहे.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# आयुष्यातील संकटं आणि आपली माणसं...

आपल्या आयुष्यात अनेकदा आपल्याला विविध संकटांचा सामना करावा लागत असतो. हे संकटे आर्थिक असू शकतात, मानसिक ताणामुळे निर्माण होऊ शकतात किंवा शारीरिक आरोग्याच्या समस्यांमुळे उद्भवू शकतात. जीवनात अडचणी आणि संकटे हे अपरिहार्य घटक आहेत. प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या आयुष्यात कधी ना कधी आर्थिक, वैयक्तिक, शारीरिक आणि मानसिक संकटांचा सामना करावा लागतोच. या संकटाच्या काळात बऱ्याचदा आपल्याला इतरांकडून मदतीची, सहकार्याची आणि सहानुभूतीची अपेक्षा असते. पण आपण संकट काळात असतांना आपल्याला आपल्या लोकांकडून किती मदत मिळते हा एक अत्यंत कठीण आणि न सुटणारा प्रश्न असतो.



अडचणी आणि संकटाच्या कठीण प्रसंगी बऱ्याचदा आपण एकटे पडतो. पण संकट काळातच आपल्या आजुबाजूच्या लोकांचा खरा चेहरा उघडकीस येतो. जेव्हा आपण आयुष्यातील आलेल्या अडचणींमुळे मानसिक ताणतणावाशी लढत असतो तेव्हा आपल्याला मदतीची गरज अधिक असते पण बऱ्याचदा आपणच इतरांसमोर व्यक्त होत नसल्याने आपल्याला चिंता आणि तणावामुळे एकटेपणा वाटायला लागतो. पुढे नाते संबंधांमध्ये असलेल्या ताणामुळेही एकाकीपणाचे अनुभव येतात. नातेसंबंधांच्या तणावामुळे, विशेषतः प्रिय व्यक्तींसोबतच्या वादांमुळे आपण अनेक वेळा मानसिकदृष्ट्या खचतो, एकटे पडतो आणि निराश व्हायला लागतो. अनेकदा मित्र आणि नातेवाईक आपल्या समस्येला, अडचणींना गंभीरतेने घेत नाहीत आणि त्यामुळे आपल्याला एकटेपणा आणि निराशा जाणवत असते.

अडचणीच्या काळात मित्रांची भूमिका अत्यंत महत्वाची असते, परंतु ती कधी कधी सीमित असू शकते. काही मित्र असतात जे संकटाच्या काळात आपल्यासाठी एक मजबूत आधार बनतात, तर काही त्यांच्या स्वतःच्या समस्यांमुळे आपल्या समस्यांकडे दुर्लक्ष करतात. यामुळे, अडचणीच्या काळात आपल्या स्वतःच्या मनोबलावर विश्वास ठेवणे आणि आत्मनिर्भर होणे आवश्यक आहे. अडचणींचा सामना करताना, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आणि आत्मसंतुलन राखणे खूप महत्वाचे आहे. जीवनातील अडचणी, कितीही कठीण असल्या तरी, एक तात्पुरता भाग असतो. अशा परिस्थितीत सकारात्मक विचारसरणी आणि समस्यांचा व्यवस्थित निवारण करण्यासाठी योग्य उपाययोजना यामुळे संकटांचा सामना करण्यास मदत मिळू शकते.

आज समाजामध्ये मानसिक आरोग्याच्या बाबतीत जागरूकता वाढलेली आहे. पण तरीही आपण अनेकदा अडचणीच्या काळात एकटे पडत असतो. कुणाकडून मदत घेण्यासाठी आपण बऱ्याचदा मागे वळतो. पण संकटाच्या काळात, योग्य मार्गदर्शन आणि मदतीसाठी काउन्सलिंग, थेरपी किंवा सपोर्ट ग्रुप्सचा वापर करणे उपयुक्त ठरू शकते. यामुळे आपल्याला एक सकारात्मक दृष्टिकोन प्राप्त होऊ शकतो आणि संकटाच्या वेळी आवश्यक असलेले मदत मिळवता येते. अडचणीच्या काळात, आपल्याला इतरांचे सहकार्य मिळवण्यासाठी, त्यांच्याशी स्पष्ट संवाद साधणे आवश्यक आहे. आपल्या भावना आणि समस्यांचे प्रामाणिकपणे व्यक्त करणे आणि आपल्याला आवश्यक असलेले सहाय्य मागणे हे महत्त्वाचे आहे. यामुळे इतरांना आपल्याला आवश्यक असलेले सहाय्य देणे सुलभ होईल.

आयुष्यात अडचणी आणि संकटे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा भाग असतात. या अडचणींचा सामना करताना सकारात्मक विचारांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. संकटाच्या वेळी नकारात्मक विचारांनी आपल्या मनाला व्यापून टाकले जाते, ज्यामुळे आपले निर्णय घेणे अधिक कठीण होऊ शकते. पण सकारात्मक दृष्टिकोन ठेवून संकटांचा सामना करणे सोपे होते. सकारात्मक दृष्टिकोन आपल्याला संकटाशी, अडचणींशी सामना करण्यासाठी प्रेरणा देतात आणि समस्यांचे निराकरण करण्यात मदत करतात. शेवटी संकट काळात आपण कुटुंब, मित्र, समुपदेशक आणि सल्लागारांशी संवाद साधला पाहिजे. कारण संकट काळात आपल्या माणसांनी केलेली मदत दवाखान्यातील औषधापेक्षाही अधिक प्रभावी आणि गुणकारी असते.

**–सुरज पी. दहागावकर,**
चंद्रपूर
मो. ८६९८६१५८४८

# नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक तरतूद करण्यासाठी प्रयत्न करू -आ. बाबुराव कदम

## मालेगाव नैसर्गिक शेती कार्यशाळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** –सेंद्रिय शेतीला चालना मिळावी व शेतीवरचा खर्च कमी होऊन ग्राहकांना विषमुक्त अन्न मिळावे यासाठी शासनाने नैसर्गिक शेती अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू केले आहेत. सेंद्रिय मालाला योग्य बाजारपेठ मिळावी यासाठी व नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्यासाठी विधिमंडळात प्रामाणिक प्रयत्न करू, अशी ग्वाही आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी मालेगाव येथे राष्ट्रीय खाद्यतेल व गळीतधान्य अभियान २०२६-२७ अंतर्गत सोयाबीन गट प्रात्यक्षिक कार्यक्रमात दिली. शेतकरी मित्र फार्मर प्रोड्युसर कंपनीचे काम अत्यंत उल्लेखनीय असून, कृषी भूषण भगवान इंगोले यांनी सेंद्रिय व नैसर्गिक शेतीबद्दल शेतकऱ्यांमध्ये केलेली जागृती ही कौस्तुकास्पद असल्याचे कोहळीकर म्हणाले.

राष्ट्रीय खाद्यतेल व गळीतधान्य अभियान २०२६-२७ अंतर्गत खरीप सोयाबीन गट प्रात्यक्षिक व प्रमाणित बियाणे वितरणातील शेतकऱ्यांसाठी कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णी, कृषी विभाग महाराष्ट्र शासन व मूल्य साखळी भागीदार यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी मित्र फार्मर प्रोड्युसर कंपनी मौजे मालेगाव येथे कार्यशाळा संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगशिक्षक एकनाथराव पाटील, कंपनीचे अध्यक्ष तथा शेतकरी नेते प्रल्हाद इंगोले, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष भगवानराव कदम, प्रगतशील शेतकरी ज्ञानोबा कदम, संतोष दंडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी कृषी विज्ञान केंद्र पोखर्णीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. देविकांत देशमुख, डॉ. माणिक कल्याणकर, कृषी विभागाचे मंडळ अधिकारी देव कांबळे यांनी शेतकऱ्यांना खरीप हंगामातील पिकांचे शास्त्रीय व्यवस्थापन, विशेषतः सोयाबीन पिकातील कीड व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रणाच्या प्रभावी उपाययोजना, पीक उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञान तसेच सोयाबीन मूल्य साखळी व प्रक्रिया उद्योग याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी प्रास्ताविक व सूत्रसंचालन कृषीभूषण भगवान इंगोले यांनी केले तर आभार माधवराव कदम कोंढेकर यांनी व्यक्त केले.

या मार्गदर्शन कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांना शास्त्रीय पीक व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, उत्पादन वाढ, मूल्यवर्धन व बाजारपेठेशी जोडणी याबाबत उपयुक्त माहिती मिळाली. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून सोयाबीनचे उत्पादन व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी हा उपक्रम निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास कृषी भूषण भगवान इंगोले यांनी व्यक्त केला. यावेळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांच्या प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज भजन आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिक, शाहीर आणि लोककलावंतांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २५ ऑगस्ट २०२६ रोजी नांदेडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकदिवसीय भजन आंदोलन करण्यात येणार आहे. आपल्या न्याय व हक्कासाठी साहित्यिक व लोकपारंपरिक कलावंतांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन बहुजन टायगर युवा फोर्स आणि पारंपरिक शाहीर लोककला संवर्धन मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तसेच राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेंतर्गत लाभार्थी निवड जिल्हास्तरीय समितीचे अशासकीय सदस्य त्रिरत्नकुमार भवरे कामारीकर यांनी केले आहे.

नांदेड जिल्ह्यात विविध क्षेत्रात लोकपारंपरिक आणि लोककलेचे जतन करणारे मोठ्या संख्येने कलावंत आहेत. मात्र शासनाकडून त्यांना सध्या मिळणारे दरमहा ५ हजार रुपयांचे मानधन अत्यंत तुटपुंजे असून, वाढत्या महागाईच्या काळात त्यातून कलावंतांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला असल्याने त्यात वाढ करून ते किमान १० हजार रुपये करण्यात यावे या प्रमुख मागणीसह नांदेड जिल्ह्याचे कार्यक्षेत्र तसेच साहित्यिक व कलावंतांची वाढलेली संख्या लक्षात घेऊन मानधनासाठी पात्र लाभार्थ्यांची संख्या दरवर्षी १०० ऐवजी १००० पर्यंत वाढविणे, लाभार्थ्यांची वयोमर्यादा ५० वरून ४० वर्षे करणे, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत कलावंतांना समाजप्रबोधन व जनजागृतीच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच केंद्र सरकारकडून वयोवृद्ध कलावंतांच्या मानधनात कपात झाल्याच्या पार्श्वभूमीवर ती कपात दूर करुन महाराष्ट्र शासनाने मानधनात किमान १० हजार रुपयांची वाढ करावी, कलावंतांना मोफत घरकुल, त्यांच्या पाल्यांना इंग्रजी माध्यमातून मोफत शिक्षणाची सुविधा द्यावी, दि. १६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार संबंधित योजना ग्रामपंचायत विभाग व जिल्हा परिषदांकडे वर्ग करण्यात आली असून ती योजना पूर्ववत जिल्हा समाजकल्याण विभागाकडेच द्यावी, ग्रामीण भागातील नामवंत साहित्यिक, शाहीर आणि कलावंतांचा सांस्कृतिक कार्य विभागामार्फत दरवर्षी पुरस्कार देऊन सन्मान करावा, नांदेड शहरात भव्य सांस्कृतिक भवन उभारावे, जिल्हास्तरीय समितीसाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध करून द्यावा आदी मागण्यांसाठी जिल्हाधिकारी तथा समितीचे अध्यक्ष यांना निवेदनातून बहुजन टायगर युवा फोर्सच्यावतीने यापूर्वीच विनंती करण्यात आली.

साहित्य, शाहिरी आणि लोकपारंपरिक कलेच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे काम करणाऱ्यांनी आपल्या न्याय व हक्कासाठी या भजन आंदोलनात जिल्हाभरातून मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन भवरे यांनी केले आहे.

दरम्यान, वृद्ध साहित्यिक व कलावंतांच्या मागण्यांबाबत बहुजन टायगर युवा फोर्सच्या माध्यमातून गत अनेक वर्षांपासून शासन दरबारी पाठपुरावा करित आहोत. त्यातील बहुतेक मागण्या मार्गी लागल्या असून, प्रलंबित मागण्याही लवकरच पूर्ण व्हाव्यात त्यासाठी भजन आंदोलनातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न असल्याचे भवरे म्हणाले.



**नांदेड** –महाराष्ट्र राज्य कृषी विभागाचा प्रस्तावित अतांत्रिक आकृतीबंद रद्द करून निवेदनातील मागणीप्रमाणे तज्ज्ञ समिती गठीत करून शेतकरी केंद्रित व सक्षम तांत्रिक नवीन आकृतीबंध तयार करणे बाबत महाराष्ट्र कृषी सेवा महासंघ तालुका शाखा नांदेडच्यावतीने तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर काळ्या फिती लावून आंदोलन केले. यावेळी जिल्हाधिकारी कर्डिले यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, तालुका अधिकारी संजय चातरमल, तंत्र अधिकारी अरुण घुमूनवाड, अर्धापूर तालुका अधिकारी विशाल बिराडे, नांदेड मंडळ कृषी अधिकारी सुनील सानप, दीपक नागुरे, उपकृषी अधिकारी लक्ष्मण चुंचूवार, वसंत जारीकोटे, दिलीप काकडे, दत्ता भुत्ते, विजयकुमार पाटील, प्रल्हाद येवते, शिवराज वसमते, व्यंकटेश पाकलवार, नितीन गोरठे आदी उपस्थित होते. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

# पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषदेच्या महिला आघाडी प्रदेशाध्यक्षपदी लक्ष्मी पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)**– पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषद, महाराष्ट्र राज्य महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी सौ. लक्ष्मी पाटील यांची निवड करण्यात आली आहे. संस्थापक अध्यक्ष भागवत देवसरकर यांनी ही नियुक्ती जाहीर केली.



निवडीनंतर सौ. लक्ष्मी पाटील म्हणाल्या की, यापुढील काळात महाराष्ट्राचे जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजयदादा विखे पाटील, सौ. शालिनीताई विखे पाटील, संस्थापक अध्यक्ष भागवत देवसरकर व प्रदेशाध्यक्ष गुणवंत आठरे पाटील यांच्या मार्गदर्शनात व नेतृत्वात महाराष्ट्रभर शेतकरी व महिला शेतकऱ्यांना संघटित करून त्यांच्या न्याय हक्कासाठी काम करणार आहे.

# लोहा ते श्रीक्षेत्र फळा पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन

**लोहा (प्रतिनिधी)**– श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जुना लोहा येथे श्रावण महिन्यानिमित्त महिना ग्रंथराज श्री ज्ञानेश्वर पारायण आणि श्री संत मोतीराम महाराज पुण्यतिथी महोत्सव उत्साहात साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने उत्सवाचे प्रमुख केंद्र लोहा ते श्रीक्षेत्र फळा पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पारंपरिक दिंडीची सुरुवात जुना लोहा येथून ३० वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरी पारायण समितीच्या वतीने करण्यात आली. ज्ञानोबा माऊली तुकाराम या नामघोषामध्ये अनेक भक्तगण या दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी होतात.

शांतीब्रह्म ह.भ.प. आत्माराम महाराज रामेज्वार यांच्या नेतृत्वामध्ये या दिंडीचे नियोजन करण्यात येते. लोहा, सुनेगाव, सातेगावपाटी, पेठशिवनी, पालम ते फळा असा पायी दिंडी सोहळ्याचा मार्ग असून, अनेकभक्त या ठिकाणी दिंडीची सेवा करतात.



या पायी दिंडीचे उत्साहात प्रस्थान झाले असून, यामध्ये ज्ञानेश्वरी पारायण समिती सदस्य बबरु पाटील पवार, गोपाळ सावकार कवठेकर, रामजी मामा दांगटे विना प्रमुख, चोपदार सोनाजी वड, माधव भोस्कर, नागोराव केंद्रे, पिंटू दांगटे, नामानंद रामेज्वार, पत्रकार रमेश पवार, मारोती चव्हाण, हणमंत पांचाळ, रुद्रा भोस्कर, दीपक वड, काळेश्वर पांचाळ, दिनेश पवार, ज्ञानेश्वर वड आदी बहुसंख्य गावकऱ्यांची उपस्थिती होती.

# प्रा. मोनिका शिंदे यांना पीएच. डी. प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)**– संगणक व्यवस्थापन विषयातील संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रा. मोनिका दत्तात्रय शिंदे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडून आचार्य पदवी प्रदान करण्यात आली आहे.



डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ एमसीए अँड मॅनेजमेंट, आकुर्डी, पुणे येथील प्राध्यापिका डॉ. कविता योगेश सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. मोनिका दत्तात्रय शिंदे यांनी Digital Farming Solution Using Neural Network for Early Detection and Identification of Fall rmyworm in Maize या विषयावर नाविन्यपूर्ण व संशोधनपर प्रबंध यशस्वीरित्या पूर्ण केला.

# ग्राहक पंचायत महाराष्ट्र अधिवेशनात भागीरथी बच्चेवार सन्मानित



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या वार्षिक अधिवेशनात मराठवाडा विभागातून नांदेड जिल्ह्यातील भागीरथी बच्चेवार यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ग्राहक जागरण पुरस्कार संघटनेचे अध्यक्ष डॉ. विजय लाड व संघटनेचे सचिव अरुण वाघमारे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात आला. नांदेड जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयात व्याख्यानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये ग्राहक जागृती व मी एक जागरूक ग्राहक आहे याविषयी निबंध स्पर्धा घेण्यात आल्या व छोट्या मुला, मुलींनी नाटिका करून दाखवल्या व भेसळयुक्त खाद्य, कुरकुरे मॅगी, पनीर, दूध, फळे, भाजीपाला या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेघना कुलकर्णी या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून सचिव अरुण वाघमारे, बालाजी लांडगे, रघुनाथराव काका, आनंद कृष्णापूरकर, पाणसे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

विशेष राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबदल अनेकांची त्यांचे अभिनंदन केले.

# पुरुषी वर्चस्वाला छेद देण्याचे कार्य संविधानाने केले -प्रा. डॉ. अशोक सिद्धेवाड

**नांदेड (प्रतिनिधी)**–पुरूषी वर्चस्वाला छेद देण्याचे कार्य संविधानाने केले, असे मत प्रा. डॉ. अशोक सिद्धेवाड यांनी मांडले.

श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय संशोधन केंद्र, सिडको, नवीन नांदेडच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या समाजकार्य पंधरवाडानिमित्त महाविद्यालयात महिला सबलीकरण कक्षाच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

'महिला विकासात भारतीय संविधानाची भूमिका' हा व्याख्यानाचा विषय होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एन. जी. पाटील हे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. अशोक सिद्धेवाड यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर उपस्थित महिला सबलीकरण कक्षाचे प्रमुख प्रा. डॉ. मनीषा मांजरमकर, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ.सत्वशीला



वरगंटे, प्रा. डॉ. प्रतिभा लोखंडे यांची उपस्थिती होती.

डॉ. अशोक सिद्धेवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पुरूषी वर्चस्वाला छेद देण्याचे कार्य संविधानाने केले. ते पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील अनेक स्त्री चळवळ व आंदोलनाचा उद्देश हाच होता की, स्त्रीला एक व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून महत्त्व मिळाले पाहिजे. पुरुषाच्या बरोबरीने तिला स्थान मिळाले पाहिजे. तसेच ते पुढे म्हणाले, बहुमत हे नेहमी बरोबरच असते असे नाही. बहुमताकडून एकतेकडे आपण वाटचाल केली पाहिजे. अल्पमताने समाजाला योग्य दिशा दिलेली आहे. पुरुषांच्या बरोबरीने हक्क देण्याच्या तरतुदी भारतीय संविधानात आहेत. फुले, शाहू, आंबेडकर यांचा संघर्ष स्त्रियांना समान अधिकार मिळवून देण्याचा होता. स्त्रीला एका बाजूला पूजनीय मानायचे आणि दुसऱ्या बाजूला तिचा अवमान करायचा ही प्रथा चालू आहे. व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची ताकद संविधानामुळे मिळाली आहे. आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत गरजा आवश्यक आहेत. प्रशासनामध्ये आज अंदाजे आठ ते नऊ टक्के महिला आपल्याला दिसत आहेत. प्रशासनामध्ये महिलांचा सहभाग वाढला पाहिजे, तेव्हा बदल दिसून येईल. भारतीय संस्कृतीने स्त्रीला गौरविले तर दुसऱ्या बाजूला अपमानित केले, याकडे डोळसपणे पाहण्याची गरज आहे. स्त्री विकासासाठी समाजाचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे, संविधानाने स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधी कायदे करण्याची तरतूद केली आहे, परंतु त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. स्त्रियांनी महत्त्वाचे पदे बदलासाठी किंवा स्त्री-पुरुष समानतेसाठी हस्तगत केली पाहिजे. राजकीय सहभाग संविधानामुळे स्त्रियांना मिळाला, परंतु पुरुषी वर्चस्व आजही या ठिकाणी दिसून येतो. यात बदल होणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले. यानंतर अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एन. जी. पाटील यांनी केला.

# प्रतिभा निकेतन महाविद्यालयात सुगंधी द्रव्य उत्पादन कार्यशाळा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील प्रतिभा निकेतन महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने 'सुगंधी द्रव्य उत्पादन निर्मिती या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

बुधवार, दिनांक १९ ऑगस्ट रोजी पार पडलेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. आर. गंगाखेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेत प्रा. आर. एस. शिंदे (दयानंद विज्ञान महविद्यालय लातूर) यांनी सुगंधी द्रव्य निर्मितीतील रसायन शास्त्र व त्यासाठी वापरण्यात येणारे रसायने यांची शस्त्रीय माहिती व ते बनवण्याची प्रक्रिया यांचे प्रात्यक्षिक करून दाखवले व त्याचा प्रत्यक्ष अनुभव मुलांना दिला. सुगंधी द्रव्य उत्पादन निर्मिती उद्योगातील वेगवेगळ्या गोष्टीची पूर्तता कशी केली जाऊ शकते आणि आपली उत्पादने बाजारात कशी विकली जाऊ शकतात याबद्दल विद्यार्थ्यांना संपूर्ण माहिती दिली. अगदी कमीत-कमी खर्चात आपण हा उद्योग सुरू करून तो अगदी मोठ्या स्तरापर्यंत घेऊन जाऊ शकतो यावद्दल विद्यार्थ्यांना विश्वास दिला. या उद्योगामधील आर्थिक गणित विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखवले. सुगंधी द्रव्यांचे विविध प्रकार कशाप्रकारे एकाच ठिकाणी तेच सर्व साहित्य वापरून आपण तयार करु शकतो याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. यामधे परफ्यूम, बॉडीमिस्ट, अत्तर व रुमफ्रेशनर या सारख्या सुगंधी उत्पादनांचा समावेश होता.

# अभ्यास हा जीवनाचा अविभाज्य भाग, त्यातूनच जगण्याची प्रेरणा

## माजी शिक्षण संचालक. डॉ. गोविंद नांदेडे यांचे प्रतिपादन

**नांदेड (प्रतिनिधी)**– अभ्यास हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे, त्यातूनच जगण्याची प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी केले.

शारदा संगीत विद्यालय, सद्भावना मंच व संस्कार भारती नांदेड महानगरच्या वतीने शिक्षण तज्ज्ञ व राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांचा नुकताच हृद्य सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.त्यांनी विविध विद्यापीठातून ३८ पदव्या घेतल्या असून, त्याची विश्वविक्रमी नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये झाली आहे. विद्यार्थी, शिक्षकप्रिय तसेच उपक्रमशील अधिकारी म्हणून त्यांची शैक्षणिक, सांस्कृतिक सामाजिक क्षेत्रात ओळख आहे. डॉ. नांदेडे यांच्या बहुमोल कामगिरीबद्दल व जिल्ह्याचे भूमिपुत्र म्हणून आनंद



व्यक्त करण्यासाठी या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे, असे शारदा संगीत विद्यालयाचे संचालक डॉ. प्रमोद देशपांडे यांनी आपल्या प्रस्तावनेत म्हटले.

याप्रसंगी गोविंद नांदेडे यांनी शिक्षणाबाबत प्रभावी भाषणातून काही मौलिक विचार मांडताना म्हटले की, ज्ञानाचे संस्कार पक्के असतात. विद्यार्थी ही संकल्पना खोटी असून, शिक्षक शिकल्याशिवाय मुलं शिकणार नाहीत. मुलांना व्यक्त होण्याची व बोलू देण्याची संधी शिक्षकांनी दिली पाहिजे. शिकवू नका, शिकू द्या, या सत्काराच्या कार्यक्रमासोबत सप्तरंग फेस्टिवल नांदेड २०२६ मध्ये ज्येष्ठ गझलकार कवयित्री सुधाताई नरवाडकर, आशाताई पैठणे व महिला संगीतकार आनंदी विकास या त्रिवेणी स्त्रीशक्तीला पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांचाही यथोचित सन्मान यावेळी करण्यात आला. आनंदी विकासचे प्रतिनिधी म्हणून त्यांचे पती विकास देशमुख उपस्थित होते.

डॉ. गोविंद नांदेडे यांचा सत्कार प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. इतर मान्यवरांचा सत्कार सौ. रश्मी वडवळकर, प्रकाश पत्तेवार व डॉ. दीपक कासराळीकर यांचे हस्ते करण्यात आला. या प्रसंगी प्रा. विलास वैद्य आणि राजेश महाराज देगलूरकर यांनी मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन जयंत वाकोडकर यांनी केले. आभार डॉ. दीपक कासराळीकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सौ. रजनी वाकोडकर, सौ. प्रणिता राणे-पवार, सौ. वर्षा भालेराव, पायल गंगातीर यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास न्यायमूर्ती शरद देशपांडे, सौ. ज्योती देशपांडे, पं. संजय जोशी, भगवानराव व सौ. शामला देशमुख, सौ. विद्या देशमुख, शिवा कांबळे, प्रणव पडोळे, प्रा. सदानंद पुंडगे, पद्मजा आलूरकर, दीपक बीडकर, रांगोळी कलाकार गोदावरी जांगीलवाड, कृष्णा जोशी व इतर मान्यवर उपस्थित होते.

# भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघ नांदेडची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)**–ब्राह्मण समाजाच्या हितासाठी भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघ नांदेड जिल्ह्यात अग्रेसर झाला असून, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी सीताराम मंदिर चिखलवाडी नांदेड येथे स. ११ वाजता सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या सभेच्या अध्यक्षस्थानी गोविंदराव चौधरी यांची उपस्थिती होती तर प्रमुख अतिथी म्हणून नांदेड येथील प्रख्यात उद्योजक नारायणराव तुपेकर, तसेच परशुराम बचत गटाचे अध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, विधीतज्ज्ञ अॅड. प्रवीण आयाचित आणि जीवनराव शेवाळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी मागील सभेचा वृत्तांत बंडोपंत कुंटूरकर यांनी वाचून दाखविला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. यावेळी नांदेड जिल्ह्यातील भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघाच्या जिल्ह्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यात कार्याध्यक्ष प्रा. रमाकांत जोशी चिखलीकर, अध्यक्ष बंडोपंत कुंटूरकर, उपाध्यक्ष सखाराम कुलकर्णी व गोविंदराव चौधरी, रघुनाथ सरदेशपांडे, सचिव कमलाकर जोशी खळीकर, सहसचिव-दत्तात्रय पारखे, कोषाध्यक्ष श्रीनिवास देशपांडे, सहकोशाध्यक्ष जगदीश कुंटूरकर, संघटक जीवनराव शेवाळकर, नीरज अवस्थी, सदस्य गौतम सुरेश बिंदू, प्रसाद देशपांडे, ओमकार लव्हेकर, विनायक पाटील, भीमराव श्रीमंत, विजय पाठक, प्रसिद्धीप्रमुख कृष्णा उमरीकर, रमाकांत घोणसीकर, सखाराम कुलकर्णी, कायदेशीर सल्लागार अॅड. सावित्री जोशी, गजानन पिंपळखडे, रमेश राजूरकर, प्रवीण आयाचित या मान्यवरांची जिल्हा कार्यकारिणीत निवड करण्यात आली आहे.

तसेच यावेळी नांदेड दक्षिण विभागाच्या महिला अध्यक्षा म्हणून सुचिता रामदास जोशी यांची निवड करण्यात आली. तसेच विविध पदांवर महिला सदस्यांची निवड करण्यात आली. तसेच नायगाव तालुकाध्यक्ष म्हणून श्यामराव (श्याम गुरु) लालवंडीकर यांची नियुक्ती करण्यात आली.

टप्प्याटप्प्याने सर्व तालुक्यांमध्ये भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघाच्या शाखा लवकरच जाहीर करण्यात येणार असून, तेथील तालुकाध्यक्ष निवडले जाणार आहेत. प्रस्तावनेत जिल्ह्यातील ब्राह्मण समाजातील आपापसातील वाद मिटवण्याचा प्रयत्न करणे, ब्राह्मण समाजात चांगले संस्कार रुजवण्यासाठी लहान वयात मुलांच्या मुंज मेळावे घेणे, तसेच परशुराम नागरी सहकारी पतसंस्था बाबत विचारविनिमय यावेळी करण्यात आला. वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात येणार असून, यात घटस्फोटीत, विधवा, अपत्य असणारे, अपत्य नसणारे, जास्त अपेक्षांमुळे वय वाढलेले, आणि सद्यस्थिती अशा सर्वांसाठी वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करणे, ब्राह्मण समाजातील महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करणे बाबत विचारविनिमय करण्यात येऊन ते त्या त्या दिवंगत नेत्यांची जयंती साजरी करण्यात यावी असे ठरवण्यात आले.

महिलांसाठी व पुरुषांसाठी विविध शासकीय योजना राबवणे तसेच नांदेडमधील ब्राह्मण संघटना एकत्रीकरण करून संयुक्त विद्यमाने अनेक कार्यक्रम घेण्याचा मानस त्यांनी बोलून दाखवला. ही बैठक घेण्यासाठी बंडोपंत कुंटूरकर, सखाराम कुलकर्णी, रमाकांत जोशी चिखलीकर, प्रसाद देशपांडे सुचिता जोशी विजय पाठक आदींनी विशेष प्रयत्न केले.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार



# फुले, पाकळ्यांतून उत्तम मूल्यवर्धन!

**अत्यंत नाजूक, सुगंधी असलेल्या फुलांच्या पाकळ्यांमध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. पाकळ्यांवर काही प्रक्रिया केल्यास एक ते चार दिवसांचा आयुष्यकाळ वाढवता येतो. त्याचप्रमाणे एक ते दोन दिवसांनंतर टाकाऊ किंवा निर्माल्य समजल्या जाणाऱ्या फुले व पाकळ्यांना उत्तम मूल्यवर्धनही मिळते. देवपूजेमध्ये फुलांचा वापर प्रामुख्याने होतो. मात्र, दुसऱ्या दिवशी मोठे हार आणि फुलांचे निर्माल्य हे नदीमध्ये टाकले जाते. ते पाण्यामध्ये कुजून दुर्गंधी पसरते. परिणामी पर्यावरणासाठी हानिकारक ठरते. मात्र, ही फुले योग्य पद्धतीने गोळा करून वाळवल्यास त्यापासून उत्तम दर्जाचा रंग व सुगंध मिळवणे शक्य आहे. देशी गुलाबाच्या फुलांपासून गुलकंदही निर्माण करता येतो.**



## झेंडू पाकळ्या

झेंडू फुलांच्या पाकळ्या गेंदापासून वेगळ्या केल्या जातात. त्यातील हिरवा भाग काढून टाकला जातो. पिवळ्या रंगाच्या पाकळ्या वाळवून त्यापासून भुकटी तयार केली जाते. चाळल्यानंतर या भुकटीचा वापर होळीचे नैसर्गिक रंग म्हणून करता येतो. त्याचप्रमाणे झेंडू भुकटीतून ओलेओरेसीन हा घटक वेगळा करता येतो. वाळविण्याच्या प्रक्रियेमध्ये सूक्ष्मजीवांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यावर लक्ष ठेवावे लागते. या वाळलेल्या पाकळ्या कोरड्या वातावरणामध्ये दीर्घकाळ साठवता येतात. फुले वाळवण्याच्या अनेक पद्धती (उदा. ओव्हन ड्रायिंग आणि ओपन एअर ड्रायिंग) आहेत. अर्थात प्रत्येक फुलाच्या प्रकारानुसार तापमान आणि वाळवण्याचा कालावधी वेगळा असतो. झेंडूच्या पाकळीच्या पिवळ्या भागामध्ये ल्युटेन हा घटक असतो. तो ॲण्टीऑक्सिडेंट म्हणून उपयुक्त आहेत. विशेषतः डोळ्यातील बुबुळामध्ये अतिनिल किरणांमुळे निर्माण मुक्तआयनांच्या उदासीनीकरणासाठी ल्युटेन उपयुक्त ठरतो. माणसांना हा घटक तयार करता येत नाही. तो आहारातून विशेषतः फळे, भाज्या आणि पूरक आहारातून घेणे आवश्यक असते. वाळवलेल्या झेंडूच्या फुलांमध्ये ०.१-०.२ टक्के कोरडे वजन मिळते, त्याच्या सुमारे ८० टक्के ल्युटेन पाचक घटक असतात. ल्युटेन भुकटी, तेल किंवा बीडलेट स्वरूपामध्ये पूरक आहारामध्ये वापरता येतात. वाळवून बारीक केलेल्या झेंडू फुलांपासून ओलेओरेसिन हा घटक मिळतो. झेंडूच्या ताज्या फांद्या आणि फुलांच्या पाकळ्यांपासून तेल मिळवता येते. हे तेल त्वचेच्या समस्या, दाह, लहान मुलांमध्ये डायपरमुळे येणारे रॅशेस व अन्य त्वचेच्या समस्यांसाठी वापरता येते. बेबी ऑइल म्हणून हे तेल उत्तम ठरते.

## गुलाब पाकळ्या

वापरलेल्या फुलांचा वापर पुन्हा सुशोभीकरणासाठी होऊ शकतो. त्याचप्रमाणे त्यातून तेल मिळवून त्याचा वापर टर्पेन्टाईन, तिळ तेल किंवा जवस तेलाप्रमाणे करता येतो. कात्रीचा वापर करून फुलांपासून पाकळ्या वेगळ्या करतात. त्या एका थरामध्ये ठेवून सावलीमध्ये वाळवल्या जातात किंवा मायक्रोवेव्ह ओव्हनमध्ये वाळवल्या जातात. त्यासाठी प्लेटमध्ये कागदी टॉवेलवर एका थरामध्ये पाकळ्या ठेवून ओव्हन ठेवल्या जातात. त्यावर दुसरा पेपर टॉवेल ठेवतात. त्यावर दुसरी प्लेट अशाच पद्धतीने ठेवली जाते. सुमारे ४० सेकंदांसाठी उच्च तापमानावर उष्ण केल्या जातात. या पाकळ्या कोरड्या वाटतील पण त्यांचे तुकडे पडणार नाहीत इतपतच वाळवाव्यात. त्यात किचिंतही आर्द्रता असल्याचे जाणवल्यास पुन्हा एक वरीलप्रमाणे प्रक्रिया करावी.

- गुलाब तेल काढण्याची प्रक्रिया : सॉस पॅनमध्ये काही इंच पाणी घेऊन ते उकळून घ्यावे. त्यानंतर आचेवरून दूर करावे. एका काचेच्या ग्लासमध्ये एक कप तेल घ्यावे. या तेलाला शक्यतो कोणताही गंध नसावा. अन्यथा त्याचा उग्रपणा गुलाबाच्या गंधाला मारून टाकू शकतो. शक्यतो जोजोबा आणि द्राक्षबियांचे तेल हा उत्तम पर्याय ठरतो. ते उपलब्ध नसल्यास ओलिव्ह तेलानेही काम साधू शकते. या तेलामध्ये कुस्करून बारीक केलेल्या गुलाब पाकळ्या टाकाव्यात. केवळ सर्व पाकळ्यांना तेल लागेल इतपत सावकाश जार हलवा. त्या जारवर झाकण ठेवून, तो गरम पाण्यामध्ये ठेवावा. तेल गरम झाल्यानंतर गुलाबाच्या पाकळ्यांतील गंध त्यात उतरू लागेल. जेव्हा पाणी थंड होऊ लागेल, त्यावेळी जार खिडकीजवळच्या उन्हामध्ये पुढील चोवीस तासांसाठी ठेवावा. मलमल कापडाच्या साह्याने तेल गाळून घ्यावे. पाकळ्या व्यवस्थिक दाबून त्यातील सर्व तेल काढावे. तेलामध्ये गंध उतरण्यासाठी ही प्रक्रिया पाच ते सहा वेळा पुन्हा पुन्हा करावी. हे गंधयुक्त तेल गडद रंगाच्या व घट्ट झाकण असलेल्या बाटलीमध्ये काढून ठेवावे. शक्यतो काळ्या रंगाची बाटली घेतल्यास सूर्यप्रकाशापासून बचाव होतो आणि तेल अधिक काळ स्थिर राहते.



- गुलाब पाणी तयार करणे : गुलाब पाणी तयार करणे हे अत्यंत सोपे आहे. त्यासाठी गुलाबाच्या पाकळ्यांमध्ये एकास दोन या प्रमाणात उकळते पाणी टाकावे. पाणी थंड झाल्यानंतर गाळून घ्यावे. निर्जंतुक बाटलीत भरून ही बाटली रेफ्रिजरेटरमध्ये ठेवल्यास हे पाणी एक महिन्यापर्यंत चांगले राहते.
- गुलाबपाणी आणि गुलाब तेलांचा वापर करण्याची पद्धत रू घरगुती पद्धतीने बनवलेले गुलाबपाणी व गुलाब तेल यांचा वापर मसाज तेलामध्ये, अत्तर निर्मिती किंवा घरगुती बनवलेल्या ग्लिसरीन साबणामध्ये करता येतो. गुलाब पाण्याचा वापर रोजच्या चहा, मिठाई किंवा बेकरी उत्पादनामध्येही करता येतो.

# मळणी यंत्र; राहा सतर्क!

**मळणी हे अत्यंत महत्त्वाचे काम असते. पारंपरिक पद्धतीमध्ये हाताने झोडून, बैलाद्वारे किंवा पारंपरिक पद्धतीने लोंब्या, ओंब्या किंवा शेंगांतून दाणे वेगळे केले जात. मात्र अलीकडे या कामासाठी यंत्रांचा वापर वाढला आहे. यंत्रामुळे माणसांचे श्रम कमी झाले असून, वेळही वाचत आहे. पूर्वी ज्या कामांना महिन्यांचा कालावधी लागत असे, ती आता काही दिवसांत पूर्ण होत आहे. मळणी यंत्राची (थ्रेशर) कार्यक्षमताही वाढत चालली आहे. अशा वेळी यंत्रांमुळे होणाऱ्या अपघातांचे प्रमाणही वाढलेले दिसते. कोणताही अपघात हा माणसांच्या जीवितहानी (मृत्यू) किंवा जीवितावर कायमस्वरूपी परिणाम करणारा (कायमचे अपंगत्व) असू शकतो. त्यामुळे मळणी यंत्रासोबत काम करताना प्रत्येकाने जागरूक राहून काही खबरदारी घेतली पाहिजे...**

### »योग्य यंत्राची निवड

मळणी यंत्र (थ्रेशर) खरेदी करताना ते भारतीय प्रमाणीकरण यंत्रणेद्वारे तपासलेले व आयएसआय मार्किंग केलेले आहे का, यावर प्रथम लक्ष द्यावे. त्यात त्यावर काम करणाऱ्या माणसांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य त्या काळजी व संरक्षक आवरणे दिलेली आहेत का, हे पाहावे. ज्याच्या फीड ड्रेनची लांबी किमान ९०० मिमी व रुंदी (ड्रमच्या तोंडाजवळ) किमान २२० मिमी आहे, त्याच्या वरील आच्छादनाची लांबी किमान ४५० मिमी असली पाहिजे. त्यामुळे हात धुऱ्यापर्यंत सहज पोहोचू शकत नाही. झाकलेल्या भागाची उचल १०० ते ३०० मिमी असावी. थ्रेशरसह ५-१० अंशांच्या कोनात स्टफिंग शूट वरच्या दिशेने झुकवून पीक सहजपणे थ्रेशरमध्ये टाकता येते. फीड ड्रेनमध्ये कुठेही टोकदार कोन असू नयेत.

## यंत्रात पिके टाकण्याची पद्धत

एखाद्या व्यक्तीद्वारे मळणी यंत्रामध्ये पीक टाकण्याचे काम केले जाते. अनेकदा थ्रेशरमध्ये पटकन पीक टाकण्याचा प्रयत्न केला जातो. या घाईमुळे कधी कधी अपघात होतात म्हणून थ्रेशरमध्ये पीक टाकण्यासाठी दोन व्यक्ती असाव्यात. एका व्यक्तीने खालून पीक उचलून द्यावे आणि दुसऱ्या व्यक्तीने ते मशिनमध्ये टाकावे. थ्रेशरमध्ये पीक टाकणारी व्यक्ती सपाट आणि मजबूत जागेवर उभी असावी. खाट, धान्याच्या पोते, पिकांच्या गाठी किंवा टायर आदी उभे राहून काम करताना शरीराचे संतुलन बिघडून तोल जाऊ शकतो. अशी व्यक्ती सरळ यंत्रावर पडण्याचा धोका असतो. अनेक वेळा काही व्यक्ती अधिक उंचीवर उभी राहून किंवा ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमधून थेट थ्रेशरमध्ये पीक टाकण्याचा प्रयत्न करतात. हातांचा वापर करण्याऐवजी पायाने ढकलून पीक थ्रेशरमध्ये ढकलण्याचा प्रयत्न करते. अशा वेळी तोल जाण्याचा धोका जास्त असते. पिकासोबत हात किंवा पाय आत खेचला जाऊन अपघात होऊ शकतो. सोयाबीन, हरभरा, मसूर, बाजरी आदी झुडपी पिके मळताना विशेष काळजी घ्यावी. काटेरी पिके मळताना अनेकदा शेतकरी हाताला जुन्या कापडाचा तुकडा किंवा पोते गुंडाळतात. हेही धोक्याचे असते. कारण टाकण्याच्या प्रक्रियेमध्ये कापड, पोते यांचे धागे, पट्टी किंवा लोंबणारे भाग बहुतेकदा थ्रेशरच्या धुराकडे खेचले जाऊ शकतात. त्यामुळे हात आत जाऊन अपघात होऊ शकतो. हातात रबरी किंवा चामड्याचे हातमोजे घालावेत. थ्रेशर चालवणाऱ्यांचे कपडे ही अंगाभोवती घट्ट असावेत. सैल कपडे उदा. कुर्ता, धोतर, महिलांची साडी किंवा लांब केस आदी पट्ट्या किंवा मशिनच्या अन्य हलत्या भागांमध्ये अडकून गंभीर अपघात होऊ शकतो. थ्रेशरवर काम करताना स्त्रियांनी केस आणि साड्या घट्ट बांधाव्यात. जेव्हा थ्रेशर बेल्ट-पुली वापरून ट्रॅक्टर किंवा अन्य कोणत्याही ऊर्जा स्त्रोतांद्वारे चालवले जातात, तेव्हा हलणारे भाग लाकडी चौकटीने किंवा लोखंडी जाळीने झाकावेत. तिकडे लहान मुले जाणार नाहीत, याची विशेष काळजी घ्या.




### जास्त थकवा देतो अपघाताला आमंत्रण

सलग काम करून वेगाने काम संपवण्याकडे साऱ्यांचा (मशिनचालक, मालक आणि शेतकरी यांचा) कल असतो. मात्र सलग विशेषतः रात्री उशिरापर्यंत काम करणे शक्यतो टाळावे. कोणत्याही स्थितीमध्ये थकल्यावर काही काळ तरी विश्रांती घ्यावी. शक्य असल्यास यंत्रावर काम करणाऱ्या व्यक्ती दर काही काळानंतर बदलून आराम द्यावा किंवा वेगळे काम द्यावे. थकवा, झोप आल्यामुळे अपघात होण्याची प्रमाण जास्त असते. थकलेल्या स्थितीत मळणी यंत्रात पिकांच्या फांद्या भरण्याचे काम करू नये. थ्रेशरच्या स्टफिंग शूटची उंची आपल्या कोपराच्या उंचीइतकीच असावी. त्यापेक्षा स्टफिंग शूटची उंची जास्त असताना सतत हात उंचावून टाकावे लागते. ही उंची फारच कमी असल्यास कंबरेतून वाकून दीर्घकाळ काम करावे लागते. या दोन्ही बाबतीत जास्त थकवा जाणवतो. थ्रेशरवर ३-४ तासांपेक्षा अधिक काळ सलग काम करू नका.

### यंत्राची योग्य तपासणी आवश्यक

थ्रेशर सुरू करण्यापूर्वी त्याची तपासणी करून घ्यावी. विशेषतः थ्रेशरच्या आत फिरणारे लोखंडी भाग, ड्रममधील भाग सैल नाहीत, त्यांचे आवाज येत नाहीत ना, घासले जात नाहीत ना, हे लक्षपूर्वक पाहावे. अनेक वेळा सतत होणाऱ्या घर्षणामुळे आग लागू शकते. विजेवर चालणाऱ्या थ्रेशर संदर्भात विद्युत तारा, जोड उघडे राहणार नाहीत, याची काळजी घ्यावी. या वायरी फार ताणू नयेत. त्यातून अपघात होऊन विजेचा धक्का बसणे किंवा आग लागणे अशा घटना उद्‌भवू शकतात. विजेचा शेतात किंवा कोठारात उघडे ठेवू नका जिथे थ्रेशर चालू आहे. जर एखादी व्यक्ती वायरच्या संपर्कात आली तर विद्युतदाबामुळे करंट लागू शकतो व कोठारात आग लागू शकते.

# कंदपिकांचे आंतरपीक

**फळपिकामध्ये आंतरपीक म्हणून कंदपिकाची योग्य निवड तसेच कमी कालावधीच्या जातीची निवड करणे आवश्यक आहे. कंदपिकासाठी वेगळे खत व पाणी व्यवस्थापन करावे. त्यामुळे मुख्य पिकाची वाढ आणि उत्पादनावर विपरीत परिणाम होणार नाही. कोकणामध्ये आंबा, काजू, नारळ, सुपारीमध्ये आंतरपीक म्हणून काही कंदवर्गीय पिकांची लागवड फायदेशीर ठरू शकतात. कोकण व्यतिरिक्त राज्यातील इतर विभागातही नवीन लागवड केलेल्या बागांमध्ये कंदपिकांचा समावेश आंतरपीक म्हणून करावा.**



## आंतरपिकांचे नियोजन करताना

कंदपिकाची आंतरपीक म्हणून लागवड करताना मुख्य फळपिकांच्या कामामध्ये अडथळा येणार नाही याची काळजी घ्यावी. फळपिकामध्ये आंतरपीक म्हणून कंदपिकाची योग्य निवड तसेच कमी कालावधीच्या जातीची निवड करणे आवश्यक आहे. मुख्य पिकाशी अनद्रव्य, पाणी, सूर्यप्रकाश इत्यादी मूलभूत गोष्टीशी मोठ्या प्रमाणात स्पर्धा होणार नाही याकडे लक्ष द्यावे. कंदपिकासाठी वेगळे खत व पाणी व्यवस्थापन करावे. त्यामुळे मुख्य पिकाची वाढ आणि उत्पादनावर विपरीत परिणाम होणार नाही. आंतरपिकाची लागवड करताना मुख्य पिकाचे वय, लागवडीचे अंतर, झाडाचा विस्तार, झाडाची ठेवण, मुळाचा विस्तार, मधल्या जागेतील सूर्यप्रकाशाची उपलब्धता, सिंचन सुविधा, जमिनीचा प्रकार, पिकाची कालावधी इत्यादी बाबींचा विचार करावा. मुख्य फळपिकामध्ये लागवडीच्या सुरुवातीच्या कालावधीत पुरेशा प्रमाणात जागा उपलब्ध असल्यामुळे कंदपिकांची सलग लागवडीप्रमाणे लागवड करण्यास हरकत नाही. मात्र जसजसे फळपिकाचे वय व विस्तार वाढेल तसतसे पीकनिहाय कंदपिकाची नेहमीच्या लागवड पद्धतीमध्ये योग्य ते बदल करून घ्यावेत.

## आंतरपिकासाठी लागवड पद्धती

आंबा व काजूमध्ये कंदपिकांची लागवड करताना खरीप हंगामात बागेतील मधल्या जागेत कणगर, करांदा, घोरकंद यासाठी ९० सें.मी. अंतरावर लागवड करावी. रताळी पिकासाठी ६० सेंमी अंतरावर सऱ्या करून लागवड करावी. अति पावसाच्या प्रदेशात कंदपिकांची लागवड जमिनीचा उतार लक्षात घेऊन करावी. रताळ्यासारख्या पिकामुळे जमिनीवर अच्छादन तयार होऊन जमिनीची धूप कमी होते. तसेच पाणी व मृदा संधारणाचे काम होते.

## नारळ बागेतील आंतरपिके

| आंतरपीक | सुधारित जात |
|---|---|
| सुरण | गजेंद्र |
| कणगर | कोकण कांचन, श्री लता |
| घोरकंद | कोकण घोरकंद, श्री कार्तिकी |
| करांदा | कोकण कालिका |
| रताळी | कोकण आश्विनी, कमल सुंदरी |
| वडीचा अळू | कोकण हरितपर्णी |
| शेवरकंद | श्री जया, श्री विजया |

योग्य अंतर ठेवलेल्या बागेमध्ये सूर्यप्रकाशाची उपलब्धता आंतरपिकासाठी होऊ शकते. नारळाच्या बुंध्यापासून २ मीटर अंतर सोडून मधल्या जागेत आंतरपिके घ्यावीत. सुरणाची लागवड ६० सें.मी. बाय ६० सें.मी. अंतरावर तसेच शेवरकंदाची लागवड ९० सें.मी. अंतरावर सऱ्या करून करावी. वडीचा अळूसाठी नेहमीच्या ७५ सें.मी. बाय ७५ सें.मी. अंतरापेक्षा जवळ लागवड करावी. घोरकंद लागवड करताना २०० ते २५० ग्रॅम वजनाचे बेणे नारळ झाडाच्या सभोवती २ मीटर अंतरावर आळे करून त्यांच्या वरंबावर लागवड करावी. घोरकंदाच्या वेली नारळाच्या सर्व बाजूंनी दोरीच्या साह्याने आधार देत चढवाव्यात. सुरण, आरारूट, भाजीचा अळू नारळ बागेमधल्या मोकळ्या निचऱ्याच्या जागेत खड्डे करून लागवड करावी. यानंतर या खड्ड्यात मातीची भर द्यावी.



# भाजीपाल्यावर प्रक्रिया!

**सौर ऊर्जेवरील ड्रायर, इलेक्ट्रिक ड्रायरच्या साहाय्याने प्राथमिक प्रक्रिया करून भाज्या सुकविता येतात. अशा ड्रायरमध्ये भाजीपाला कमी वेळात सुरक्षितपणे वाळविता येतो.**

भाज्यांची काढणी केल्यानंतर विक्रीपर्यंत योग्य काळजी घेणे आवश्यक असते. काढणी केल्यानंतर भाज्या स्वच्छ धुवून घ्याव्यात. यामुळे खराब व रोगट फळे, भाजी बाजूला काढावी. त्यानंतर आकार व रंगानुसार भाज्यांची प्रतवारी करावी. योग्य पद्धतीने पॅकिंग करावे. यामुळे वाहतूक करताना होणारे नुकसान टाळता येते. भाजीपाला काही दिवस शून्य ऊर्जा शीतगृहात ७ ते ८ अंश सेल्सिअस आणि ८५ ते ९५ टक्के आर्द्रतेमध्ये भाज्या ७ ते ८ दिवस चांगल्या राहतात.

## भाजीपाला सुकविण्यासाठी ड्रायर

- सौर ऊर्जेवरील ड्रायर : सौर उर्जेद्वारे भाज्या वाळवता येत असल्यामुळे वीजेचा खर्च वाचतो. अशा प्रकारचे ड्रायरमध्ये सुकविलेल्या भाज्यांची योग्य प्रकारे साठवण केल्यास सहा महिने ते एक वर्ष चांगल्या टिकतात. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने सौर ऊर्जेवर आधारित ड्रायर तयार केला आहे. त्यांची अंदाजे किंमत १२,००० रुपये आहे. आरती संस्थेने बांबू पासून तयार केलेला सोलर ड्रायर. अंदाजित किंमतः ७,००० ते ८,००० रुपये. सायन्स फॉर सोसायटी यांनी तयार केलेला सोलर ड्रायर. अंदाजित किंमतः ३०,००० ते ३५,००० रुपये.
- इलेक्ट्रिक ड्रायर : विविध क्षमतेनुसार बाजारात इलेक्ट्रिक ड्रायर उपलब्ध असून त्यांच्या किमतीमध्ये विविधता आहे. यासाठी विजेचा वापर होत असल्यामुळे सुकविण्याचा खर्च वाढतो.अंदाजित किंमत : १८,००० ते ३०,००० रुपये.

### भाजीपाल्यावर प्रक्रिया

सूर्याच्या उष्णतेने उघड्यावर देखील पारंपरिक पद्धतीने भाज्या सुकविल्या जातात. पण अशा प्रकारे भाजी सुकविताना स्वच्छतेबाबत योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक असते. सुकविताना त्यावर आच्छादन घालावे. या शिवाय सौर ऊर्जेवरील ड्रायर, इलेक्ट्रिक ड्रायरच्या साहाय्याने प्राथमिक प्रक्रिया करून भाज्या सुकविता येतात.

# शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या दुसरा हप्ता जारी

**मुंबई (प्रतिनिधी)** – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना रू. ५,०८६ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट ऑनलाइन पद्धतीने वितरित करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या योजनेच्या अंमलबजावणी अंतर्गत आतापर्यंत १२,५८,२४३ शेतकऱ्यांना एकूण रू. १०,११५ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे. पात्र शेतकऱ्यांना लाभ वितरणाची प्रक्रिया सुरू असून, लाभार्थींची संख्या सातत्याने अद्ययावत होत आहे.आतापर्यंत १३.७० लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील लाभ वितरण ऑनलाइन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्रिमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.

**दुसऱ्या टप्प्यात विभागनिहाय लाभ**

अमरावती विभाग : १ लाख ४५ हजार ८०८ शेतकऱ्यांना रू. १,२०८ कोटींचा लाभ. नाशिक विभाग : ८४ हजार ८१३ शेतकऱ्यांना रू. ७५६ कोटींचा लाभ. छत्रपती संभाजीनगर विभाग : ३ लाख २ हजार २७३ शेतकऱ्यांना रू. २,२८४ कोटींचा लाभ. पुणे विभाग : ४९ हजार २२४ शेतकऱ्यांना रू.४१७ कोटींचा लाभ. नागपूर विभाग : ४४ हजार ८६४ शेतकऱ्यांना रू.३६६ कोटींचा लाभ. कोकण विभाग : ९ हजार ५४ शेतकऱ्यांना रू.५४ कोटींचा लाभ.

# 'महा ई-एचआरएमएस' प्रणाली ही गतिमान प्रशासनाचा चेहरा ठरेल -मुख्यमंत्री फडणवीस

## महाराष्ट्राने देशासमोर ठेवली डिजिटल सामर्थ्याची यशोगाथा

**मुंबई (प्रतिनिधी)** – देशात मनुष्यबळ व्यवस्थापनामध्ये राज्याने अनेक सुधारणांसह आमूलाग्र बदल केले आहेत. या सुधारणांमध्ये महाराष्ट्र हे देशात अव्वल आहे. त्याचेच उदाहरण ही 'महा ई-एचआरएमएस' प्रणाली आहे. ही प्रणाली गतिमान प्रशासनाचा चेहरा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त करीत महाराष्ट्राने डिजिटल सामर्थ्याची आणखी एक उत्तम यशोगाथा देशासमोर ठेवली असल्याचे गौरवोद्गारही काढले.

महाराष्ट्र शासनाच्या 'महा ई-एचआरएमएस', 'महा-आयएएस' आणि 'मेंटॉर मेंटी पोर्टल' या डिजिटल मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालींचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे आयोजित कार्यक्रमात शुभारंभ करण्यात आला, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी 'जिज्ञासा' या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सहाय्यकासह देशातील पहिले स्वयंचलित मॉड्यूलही कार्यान्वित करण्यात आले.

याप्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, कौशल्य, रोजगार, नाविन्यता आणि उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा, भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शासकीय व्यवस्थेमध्ये सेवा देताना अधिकारी, कर्मचारी शासन निर्णय, नियम आणि 'टिकमार्क' करण्याच्या पद्धतीमध्ये अडकून गेलेला असतो. शासकीय प्रक्रिया पुनर्रचना अर्थात जीपीआर अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या व्यापक प्रशासकीय सुधारणांचा हा पहिला टप्पा आहे. शतकाहून अधिक काळ प्रचलित असलेल्या कागदाधारित प्रशासकीय कार्यपद्धती आणि सेवापुस्तकाच्या देखभालीचे आधुनिकीकरण करून त्या अधिक सुलभ, गतिमान आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यासाठी हा उपक्रम महत्वाचा आहे. राज्य शासनाने सुमारे दोन वर्षांपूर्वी सुरू केलेल्या शासकीय प्रक्रिया पुनर्रचना उपक्रमाचा आणि प्रस्तावित एकात्मिक मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालीचा हा प्रमुख घटक आहे.

शासकीय सेवेमध्ये कार्यरत असताना 'मोटिव्हेशन' मिळणे हे महत्त्वाचे असते. यामुळे कामातील उत्साह कायम राहतो. शासकीय सेवेमध्येही पदोन्नती हे 'मोटिवेशन' आहे. या प्रणालीमुळे पदोन्नतीची प्रक्रिया गतिमान होऊन शासकीय सेवेमध्ये नियुक्ती आदेशापासून ते सेवा निवृत्तीच्या कागदपत्रापर्यंत संपूर्ण व्यवस्था डिजिटल स्वरूपात आली आहे. यंत्रणेमधील प्रत्येक अधिकाऱ्याला 'ग्राउंड रियालिटी'वर काम केलेले असल्यामुळे राज्यापुढील आव्हाने, प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या अनुभवांचा, ज्ञानाचा चांगला उपयोग होतो. सामान्य प्रशासन विभागाने या प्रणालीच्या विकासात मोलाची भूमिका बजाविल्याबद्दल विभागाचे अभिनंदनही मुख्यमंत्र्यांनी केले.

# ज्येष्ठ व्याकरणतज्ज्ञ डॉ. यास्मिन शेख यांचं वयाच्या १०१ व्या वर्षी निधन



**पुणे (प्रतिनिधी)** – मराठी भाषा, व्याकरण आणि भाषाशास्त्राच्या क्षेत्रात अत्यंत मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ व्याकरणतज्ज्ञ डॉ. यास्मिन शेख (वय १०१) यांचे सोमवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य आणि व्याकरण विश्वातील एक व्रतस्थ अभ्यासक हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यांच्या मागे डॉ. शमा आणि प्रा. रुकसाना या दोन मुली असा परिवार आहे.

जन्माने ज्यू असलेल्या यास्मिन शेख यांचे पूर्वाश्रमीचे नाव जेरुषा रुबेन असे होते. ज्येष्ठ साहित्यिक वसंत कानेटकर यांच्या पुढाकाराने त्यांची भेट नाशिकमध्ये काम करणाऱ्या अझीझ अहमद इब्राहिम शेख (डॅडी शेख) या मुस्लिम तरुणाशी झाली. १९५० मध्ये त्यांनी विवाह केला. त्यांनी स्वतःचा धर्म बदलला नाही, मात्र जेरुषा रुबेन ऐवजी 'यास्मिन शेख' हे नाव स्वीकारले.

प्रा. श्री. म. माटे यांच्या विद्यार्थिनी असलेल्या यास्मिन शेख यांनी श्री. पु. भागवत आणि वसंत कानेटकर यांच्यासारख्या दिग्गज साहित्यिकांसोबत काम करत भाषाशास्त्र आणि व्याकरणासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले.

## Change In Name

I, MD ISMAILODDIN FAROOQUI, hereby declare that in my name was printed as FAROOQUI MOHAMMAD ISMAILODDIN in my old passport. The passport number is N2522366, and the file number is NG1069130899615. I now wish to renew my passport. Kindly print his corrected name as MD ISMAILODDIN MD WAHIDODDIN FAROOQUI on the renewed passport.

-Address- House No. 1076/1, Farooqui Street, Biloli Tq Biloli Dist Nanded Pin-431710, Maharashtra Mob. 9922702436

## Change In Name

My old Name is **ZAIBUNNISA** Which now I am Changing as New Name **JAIBUNNISA BEGUM** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: TIPU SULTAN ROAD, IMRAN COLONY, ITWARA, Nanded, 431604 Mob: 7972829471

## जमीन विकणे आहे

माझी नंदु भगवानराव हंबर्डे रा. विष्णुपूरी नांदेड या नावाने डेरला येथील गट नं. २४ मधील ४ एकर जमीन योग्य किंमत आल्यास विकणे आहे. सदर जमीन विष्णुपूरीजवळ धनगरवाडी पाटीपासून पूर्वेला १ कि.मी. अंतरावर आहे.

तरी इच्छुकांनी खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क मोबाईल – ९८३४७३९७०१**

## Change In Name

My old Name is **SHAIKH IRFAN** Which now I am Changing as New Name **SHAIKH IRFAN SHAIKH RABBANI** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address : 95/3 NEAR GRAM PANCHAYAT ROAD WAJEGAON NANDED

## Change In Name

My old Name is **WAGHMARE YESHWANTRAO MARIBA** Which now I am Changing as New Name **YESHWANT MARIBA WAGHMARE** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address : S/o. Mariba Waghmare Shivsai agar Taroda Bk Nanded Taroda Bk Nanded Maharashtra-461605

## आक्षेपार्थ जाहीर प्रगटन

**(मौजे रहिमपुर (खु.) ता.जि. नांदेड येथील गट क्र. २८ मधील प्लॉट क्र. २२, २३ एकूण क्षेत्रफळ २४०० चौ.फुट / २२६.५ चौ.मीटर बाबत.)**

सर्व जनतेस, संबंधित व्यक्तींना तसेच प्रस्ताव व्यवहारातील पक्षकारांना या जागीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, मौजे रहिमपुर खुर्द, ता. जि. नांदेड नावाश मनपा हद्दीतील गट क्र. २८ मधील प्लॉट क्र. २२,२३ एकूण क्षेत्रफळ २४०० चौ. फुट (२२३.०५ चौ.मी.), याबाबत मालक श्री विठ्ठल मोनाप्पा शेट्टी रा. शारदा नगर, यांनी श्रीमती नसीम बेगम शेख उस्मान रा. हिलालनगर नांदेड यांच्या हक्कात करारनामा केल्याचे जाहीरन प्रगटन दि. २२.०८.२०२६ रोजी दै. प्रजावाणीमध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहे.

सदर जाहीर प्रगटनास माझे पक्षकार श्री बालाजी सूर्यकांत चौधरी रा. नांदेड टाऊन मार्केट सोसायटी, सम्राट नगर, अण्णाभाऊ साठे पुतळ्याजवळ, नादेड मो. ७०३८२७७३११ यांच्या वतीने स्पष्ट व ठाम आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

कारण असे की, वरील गट क्र. २८ मधील प्लॉट क्र. १ ते २५ एकूण २५ प्लॉट बाबत त्यामध्ये सदर प्लॉट क्र. २२ व २३ समावेश असताना, सदर मिळकतीचे मालक श्री विठ्ठल मोनाप्पा शेट्टी यांनी माझे पक्षकार श्री बालाजी सूर्यकांत चौधरी यांच्या हक्कात यापूर्वीच करारनामा करून दिलेला आहे. सदर व्यवहार हा संबंधित अभिलेख ७/१२ उतारा, फेरफार क्र. २५२७, खाते क्र. ११०६ अनुषंगाने आहे.

सदर पूर्वीचा करार अस्तित्वात असताना व त्यानुसार माझे पक्षकार सदर मिळकतीवर आपला कायदेशीर हक्क सांगत असताना कराराप्रमाणे विक्रीखत करून देण्यास श्री विठ्ठल मोनाप्पा शेट्टी यांनी टाळाटाळ केल्यामुळे माझे पक्षकार यांनी त्यांच्या विरोधात माननीय सक्षम दिवाणी न्यायालय, नादेड येथे आरसीएस नं. २८२/२०२६ हा दिवाणी दावा दाखल केलेला असून सदर दावा न्यायप्रविष्ठ व प्रलंबित आहे.

त्यामुळे सदर मिळकतीतील प्लॉट क्र. २२ व २३ तसेच संबंधित मिळकतीबाबत पूर्वीचा करार व त्यावरून निर्माण झालेले हक्क, दावे न्यायालयसमोर विचाराधीन असताना त्याचा मिळकतीचा पुन्हा तृतीय व्यक्तीच्या हक्कात करार करून देणे अथवा त्यावर आधारीत पुढील विक्रीखत, हस्तांतरण, गहाण, अदलाबदल, दान, बक्षीसपत्र किंवा अन्य कोणताही दस्ताऐवज करणे हा माझ्या पक्षकाराच्या हक्काचा बाधक ठरणारा व्यवहार आहे.

त्यामुळे श्रीमती नसीम बेगम शेख उस्मान तसेच प्रस्तावित व्यवहाराशी संबंधित सर्व व्यक्तींना या जाहीर प्रगटनाद्वारे स्पष्टपणे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत पूर्वीचा करार अस्तित्वात असून त्यासंबंधी आर.एसीएस नं. २८२/२०२६ हा दावा न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे सदर न्यायप्रविष्ठ व वादग्रस्त मिळकतीचा कोणताही पुढील व्यवहार करण्यापूर्वी संबंधित न्यायालयीन प्रकरणाची व पूर्वीच्या कराराची संपूर्ण माहिती तपासणे आवश्यक आहे.

सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यानंतरही जाणीवपूर्वक अथवा सदर पूर्वीच्या व्यवहाराची व न्यायप्रविष्ठ दाव्याची माहिती असताना कोणत्याही व्यक्तीने सदर मिळकतीचा व्यवहार केला, विक्रीखत करून घेतले अथवा करून दिले किंवा कोणताही तृतीय पक्षीय हक्क निर्माण केला, तर त्यास माझे पक्षकार कोणत्याही प्रकारे संमती देत नाहीत व अशा व्यवहारामुळे उद्भवणाऱ्या सर्व कायदेशीर परिणामांस संबंधित व्यक्ती स्वतः जबाबदार राहतील.

माझे पक्षकार सदर मिळकतीवरील आपले हक्क, हितसंबंध व न्यायालयीन दावे अबाधित ठेवून, आवश्यक त्या दिवाणी, फौजदारी, महसूल व इतर सक्षम कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

तरी सर्व संबंधितांनी सदर जाहीर प्रगटनाची नोंद घ्यावी व प्लॉट क्र. २२ व २३ तसेच त्यास संबंधित मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करण्यापूर्वी आवश्यक ती कायदेशीर चौकशी करावी.

हे आक्षेपार्थ जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**मार्फत : ॲड. नागनाथ बुद्धलवाड,**
**गागलेगावकर, जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड**
**मो.नं. ९४२३६९२४१२**


## Change In Name

My old Name is **ASHOK KUMAR RANJAN** Which now I am Changing as New Name **ASHOK RANJAN** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address : **ASHOK RANJAN**
LAXMI NAGAR, NANDED
Mo.No. 9373876999

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

੧ਓ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥

ਤਖ਼ਤ ਸੱਚਖੰਡ ਸ੍ਰੀ ਹਜ਼ੂਰ ਅਬਿਚਲਨਗਰ ਸਾਹਿਬ, ਨਾਂਦੇੜ-੪੩੧੬੦੧ (ਮਹਾਰਾਸ਼ਟਰ)-ਭਾਰਤ

**Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431601 (Maharashtra) -India**

Ph. No. 02462-234813, 241266, 243559, Fax No. 02462-234812
E-Mail-Contact@hazursahib.com Visit us at : http:www.hazursahib.com.

No. 1170/26-27 Date 24/8/26

**E-Tender Notice.**

**Tender are Invited from Mandap Decoration and Lighting Decoration for Guru Granth Sahib Ji Bhavan for the Function of Gurupurab Dooj Guru-Ta-Gaddi going to be Celebrate. - 2 nd Call**

The Superintendent Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib ,Nanded. Invites Online offers from experienced Contractors for Mandap Decoration and Lighting Decoration for Guru Granth Sahib Ji Bhavan for the Function of Gurupurab Dooj Guru-Ta-Gaddi going to be Celebrate under open 'E' Tender System.

Under 'E' Tender System.on Date 21 Aug 2026 Please refer our website htt:mahatender.gov.in & tender ID- 2026_TSHS_1330952_1.

The Uploaded "E" Tender Schedule is as below :-

| Sr. No. | Description of Tender | Date | Time |
|---|---|---|---|
| 1. | Date of Publish of " E" Tender | 21-08 2026 | 06:15 PM |
| 2. | Document Download/Sale Start Date | 21-08 2026 | 06:20 PM |
| 3. | Bid Submission Start Date | 21-08 2026 | 06:20 PM |
| 4. | Bid Opening Date | 31-08 2026 | 11.00 AM |
| 5 | Document Download/Sale End Date | 29-08 2026 | 01.00 PM |
| 6. | Bid Submission End Date | 29-08 2026 | 01.00 PM |

Superintendent,
Gurudwara Sachkhand Board,Nanded.

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८०८

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०१ मालमत्ता क्र. २७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, प्रकाश विठ्ठल गुडेटवावर रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २७ वार्ड ०१ विठ्ठल नारायण गुडेटवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २०७२/२६ दि. १४/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – जयस्वाल,
पश्चिमेस – पंढरी नारायण गुडेटवार,
दक्षिणेस – रोड,
उत्तरेस – गणेश गुंडेवार.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८०७

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ मालमत्ता क्र. ५२४ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, अंकुश वसंता सूर्यकाळ रा. धानोरा ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५२४ वार्ड २१ सय्यद सारखेअली सय्यद अजहरअली यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १४३/२६ दि. २९/०१/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – बोरगडी रस्ता,
पश्चिमेस – प्लॉट क्र. ७१,
दक्षिणेस – प्लॉट क्र. ६७,
उत्तरेस – प्लॉट क्र. ६९.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८०६

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. ३७५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख मुबीन शेख सलीम रा. मोमीनपुरा हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ३७५ वार्ड १९ ताहेरा खानम शेख फरीद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १०१८/२६ दि. १३/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – पांदन रस्ता, पश्चिमेस – प्लॉट क्र. ५६, दक्षिणेस – नूरजहॉ बेगम शेख लाल यांची जमीन,
उत्तरेस – ६ मी अंतर्गत रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८०५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. २६२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, आनंद गणपती सुर्यवंशी रा. सांगी ता. मुधोळ यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २६२ वार्ड १७ अंजनाबाई प्रल्हाद चव्हाण यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ४०५/२६ दि. २९/०३/२०२३ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. १८
पश्चिमेस – रस्ता,
दक्षिणेस – प्लॉट नं. २०,
उत्तरेस – प्लॉट नं. २२.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८०४

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ अ मालमत्ता क्र. ६३० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, अब्दुल जब्बर अब्दुल अजीज रा. रहिम कॉलनी ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६३० वार्ड १८ अ अदनान काशीफ अब्दुल खदीर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ९८४/२६ दि. ०६/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट क्र. २९,
पश्चिमेस – कॉलनी रस्ता २० फुट,
दक्षिणेस – प्लॉट क्र. २५,
उत्तरेस – प्लॉट क्र. २३.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८०३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १४ मालमत्ता क्र. ४७१-४७२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, खान सालेहा खानम इनाम उल्ला खान रा. रहिम कॉलनी ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४७१-४७२ वार्ड १७ मुखतार खान गुल मोहम्मद खान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ९८६/२०२६ दि. ०६/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट क्र. ५१ व ५२ ची जागा, पश्चिमेस – पांदन रस्ता,
दक्षिणेस – प्लॉट क्र. ५५ ची जागा, उत्तरेस – कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८०२

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. ३०३ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, परमेश्वर लक्ष्मणराव शक्करगे रा. हिमायतनगर ता. हितायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ३०३ वार्ड १७ विश्वांभर गोपीनाथ मादसवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २१३१/२०१३ दि. ३१/१२/२०१३ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. ६ ची जागा,
पश्चिमेस – रस्ता,
दक्षिणेस – बोरी रस्ता,
उत्तरेस – प्लॉट क्र. २० ची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८०१

नाव परिवर्तन वार्ड क्र. ५ मालमत्ता क्र. २२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, बापुराव विठ्ठलराव हरडफकर रा. हिमायतनगर ता. हिमातयतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २२ वार्ड ५ विठ्ठल संभाजी हरडफकर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १३२०/२६ दि. ११/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – विजय शिंदे यांचे घर,
पश्चिमेस – रस्ता,
दक्षिणेस – गोपाळ हरडफकर,
उत्तरेस – रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

**गोदातीर समाचार**

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# ‘जागरूक मुलगी, सुरक्षित मुलगी’ अभियानातून मुलींच्या सुरक्षेला बळ- आमदार चिखलीकर

## जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावण्यावरही भर

**नांदेड (प्रतिनिधी)** –मुलींच्या सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यासोबतच त्यांच्यात आत्मविश्वास व स्वसंरक्षणाची भावना निर्माण करण्यासाठी शांतिदूत प्रतिष्ठानच्या वतीने ‘जागरूक मुलगी, सुरक्षित मुलगी’ अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाची सुरुवात प्रायोगिक तत्त्वावर कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघातून करण्यात येणार असून, टप्प्याटप्प्याने नांदेड जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येईल, अशी माहिती आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली.



सामाजिक कार्यकर्त्या प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त शांतिदूत प्रतिष्ठानच्या वतीने नांदेड येथे आयोजित बालसुरक्षा मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. यावेळी नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण पाटील चिखलीकर, जिल्हाध्यक्ष दक्षिण रा.काँ.पार्टी शिवराज पाटील होटाळकर, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, डॉ. रमेश नारलावार, गजानन गिरी, शिक्षणाधिकारी माधव सलगर, वंदना फुटाणे, अशोक पाटील मुगावकर कार्यकारी अध्यक्ष रा.काँ.पार्टी आदींची उपस्थिती होती.

आमदार चिखलीकर पुढे म्हणाले की, जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षण विभागाने विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. शाळांमधील विद्यार्थी संख्या वाढली पाहिजे, तसेच अतिरिक्त शिक्षकांची समस्या निर्माण होऊ नये यासाठी नियोजन आवश्यक आहे. अनेक शाळांमध्ये आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे कंधार व लोहा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचे सर्वेक्षण करून ज्या शाळांना सुविधांची आवश्यकता आहे, त्यांची माहिती घेण्यात यावी. आवश्यक त्या सुविधा शांतिदूत प्रतिष्ठानच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

शांतिदूत प्रतिष्ठानच्या वतीने जागरूक मुलगी, सुरक्षित मुलगी अभियानांतर्गत गुड टच-बॅड टच बाबत जनजागृती करण्यात येत आहे. शासनाच्या उपक्रमांमध्ये लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्थांचा सहभाग वाढल्यास अशी अभियाने अधिक प्रभावीपणे यशस्वी होतात. तंत्रज्ञानाचा वापर करून समाजप्रबोधन करण्याचे काम या माध्यमातून होत असल्याचेही यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी सांगितले. महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी अभियानाचे कौतुक करून महापालिकाही या उपक्रमासोबत राहणार असल्याचे सांगितले. डॉ. रमेश नारलावार यांनी मुलींना स्वसंरक्षणासाठी काठी प्रशिक्षण देऊन प्रशिक्षणानंतर काठी मोफत देण्याचे जाहीर केले.

महापौर कविता मुळे म्हणाल्या की, मुलींना आत्मनिर्भर करण्यासाठी सुरक्षित व पोषक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. मुलींसोबत मुलांवरही योग्य संस्कार रुजविणे ही काळाची गरज आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ‘जागरूक मुलगी, सुरक्षित मुलगी’ अभियानाच्या गुड टच-बॅड टच जनजागृती व्हॅनला हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले. तसेच बालसुरक्षा मार्गदर्शन शिबिराच्या माहिती पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.

# डीवायएसपी पथकाची जुगार अड्ड्यावर धाड; चार दुचाकींसह मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत पोलीस उपअधीक्षक, धर्माबाद यांचे पथक व उमरी पोलिसांनी मोहीम राबवत एका जुगार अड्ड्यावर धाड टाकली.

उमरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोरठा शिवारात कॅनालच्या मोकळ्या जागेत सुरू असलेल्या ‘झन्ना-मन्ना’ नावाच्या पत्त्याच्या जुगार अड्ड्यावरून पोलिसांनी सात जुगाऱ्यांना रंगेहात ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून रोख रकमेसह एकूण १ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक २२ ऑगस्ट २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास पोलीस उपअधीक्षक, धर्माबाद यांचे पथक गस्तीवर असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, उमरी हद्दीतील गोरठा कॅनालच्या परिसरात अंधाराचा फायदा घेऊन काही इसम पैशांची पैज लावून ‘झन्ना-मन्ना’ नावाचा हार- जीतचा जुगार खेळत व खेळवत आहेत.

माहितीची खात्री पटल्यानंतर पोलीस पथकाने तत्काळ गोरठा शिवारात जाऊन कॅनाल परिसरात नियोजनबद्ध पद्धतीने घेराबंदी केली. पोलिसांनी सतर्कता दाखवत पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या ७ जणांना जागीच पकडले. त्यांची नावे दत्ता गंगागौड अनंतवार (वय ३५, रा. भोकर), सुनील साहेबराव वानखेडे (रा. मुधोळ गल्ली, भोकर), शेख तौफीक गौस (रा. शिक्षक कॉलनी, उमरी), विलास किशनराव पुयड (रा. सिंधी, उमरी), दत्ताप्रसाद रघुनाथ तिप्पावार (रा. गांधी नगर, भोकर), माधव चंदर सावंत (रा. गोरठा, ता. उमरी), शैलेन्द्र शंकर लंके (रा. बिलोली) अशी आहेत.

घटनास्थळाची पंचांसमक्ष पाहणी केली असता तिथे जुगाराचे साहित्य (पत्ते), रोख रक्कम ११ हजार, विविध कंपन्यांचे ४ मोबाईल फोन (किंमत ४८ हजार रुपये) आणि घटनास्थळी मिळालेली चार दुचाकी वाहने (किंमत ९५ हजार रुपये) असा एकूण १ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस अंमलदार सचिन गडपवार यांच्या तक्रारीवरून वरील आरोपींविरुद्ध उमरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. २३१/२०२६, कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आरमाळ हे करत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील (भोकर) यांच्या मार्गदर्शनाखाली धर्माबादचे उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील यांच्या नेतृत्वात सपोनि कराड, पोउपनि आरमाळ, पोलीस अंमलदार सचिन गडपवार, आचेवाड, चिटपील्ले, सय्यद फहीम, हैबतकर, पाटील यांनी पार पाडली.

# जवळा मुरार येथील जलजीवन मिशनचे काम निकृष्ट दर्जाचे

## जुन्याच पाईपलाईनची जोडणी, चौकशीची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार येथे महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा विभागाच्या जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या संदर्भात तत्काळ चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी आनंदा नागरे यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडून हे काम करण्यात येत असून, नवीन पाईपलाईन टाकणे अपेक्षित असताना ठेकेदाराने अनेक ठिकाणी जुनीच गंजलेली पाईपलाईन जोडली आहे. त्यामुळे नवीन योजनेचा लाभ नागरिकांना मिळत नसून, पाणीपुरवठा सुरळीत होण्याऐवजी गळती आणि दूषित पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. या प्रकरणी संबंधित अधिकारी व ठेकेदार यांची सखोल चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. कामाची गुणवत्ता तपासून दोषींवर कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशाराही निवेदनाद्वारे दिला आहे.

# प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त: नायगाव पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत नायगाव पोलीस ठाणे हद्दीत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्याच्या उद्देशाने साठवणूक करणाऱ्याविरुद्ध नायगाव पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत एकूण १ लाख २४ हजार ८४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



दि. २४ रोजी प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे नायगाव यांना गोपनीय माहिती मिळाली की, रातोळी, ता. नायगाव येथील निळकंठ भुजंगराव पाटील हा त्याच्या राहत्या घरात महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला गुटखा व तत्सम तंबाखूजन्य पदार्थ विक्रीच्या उद्देशाने साठवून ठेवत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पोलीस निरीक्षक अमोल भगत यांनी पोलीस पथकासह शासकीय वाहनाने रातोळी येथे जाऊन दोन शासकीय पंचांच्या समक्ष नमूद ठिकाणी छापा टाकला. छाप्यादरम्यान घरातून सागर पान मसाला ३२८ पाकिटे -किंमत ४५ हजार ९२० रुपये, एसआर-१ सुगंधित तंबाखू ३२८ पाकिटे किमत ४५ हजार ९२० रुपये, केसरयुक्त विमल पान मसाला १९० पाकिटे -किंमत १९ हजार ९५० रुपये, वि-१ तंबाखू १९० पाकिटे किंमत ८ हजार ५५० रुपये, मुसाफिर पान मसाला ३० पाकिटे किंमत २३ हजार ६०० रुपये, एम-४ रॉयल जाफराबादी जर्दा ३० पाकिटे किंमत ९०० रुपये असा एकूण जप्त मुद्देमाल १ लाख २४ हजार ८४० किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमाल दोन शासकीय पंचांच्या समक्ष सविस्तर जप्ती पंचनामा करून जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपी निळकंठ भुजंगराव पाटील, वय ६० वर्षे, रा. रातोळी, ता. नायगाव याच्याविरुद्ध पोलीस ठाणे नायगाव येथे गुन्हा रजि. नं. १८९/२०२६ कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ मधील कलम ५९(१) (२) व नियम २०११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चोरंबा पाटीजवळ कारच्या धडकेत एक ठार तर दोघे गंभीर

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – राष्ट्रीय महामार्ग ३६१ अर्धापूर -वारंगा रस्त्यावरील वडकुते पेट्रोल पंपासमोर वारंगा मार्गे जाणाऱ्या दुचाकीला कारने पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत कार पलटी खात दुसऱ्या बाजूच्या रस्त्यावर गेली. ही घटना रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी रात्री घडली आहे.



गंभीर जखमी झालेल्या तिघांना अर्धापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून संदीप हिरामण पवार झुंजून वाडी ता. कळमनुरी जिल्हा हिंगोली यांना मृत घोषित केले तर दोघे गंभीर जखमी असलेले अतुल अंकुश सोनटक्के, गणेश सुभाष मोरे दोघे रा. सोनखेड यांना उपचारासाठी शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथे दाखल केले असल्याची माहिती एस. के. ढवळे यांनी दिली आहे.

या अपघाताची माहिती मिळताच महामार्गचे पोउनी संभाजी गुट्टे, अनिल मुपडे, जहिरोद्दीन फारूखी, गुट्टे व १०८ चे डॉ. सचिन बोकारे, चालक संभाजी कल्याणकर आदींनी मदत केली.



**नांदेड** –सरदार इंद्रजीतसिंग बावरी यांच्या हत्येचा निषेध करत दोषींना कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी या मागणीसाठी सिकलीगर समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. **(छाया : करणसिंह बैस, नांदेड)**

# आसना पुलावरील अपघातात एक ठार, एक गंभीर जखमी

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –राष्ट्रीय महामार्गावरील आसना पुलाजवळ सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी दुपारी अपघात झाला. अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने या अपघातात अर्धापूर येथील किरण सुरेश वंटणकर (वय २२) हा तरुण जागीच ठार झाला तर त्यांचा चुलतभाऊ कल्याण सुरेश वंटणकर हा गंभीर जखमी झाला.

अर्धापूर शहरातील किरण वंटणकर आणि कल्याण वंटणकर हे दोघे दुचाकीने नांदेडहून अर्धापूरकडे येत असताना आसना पुलावर अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली व ते वाहनासह घटनास्थळावरून पळून गेले. या धडकेत दोघेही महामार्गावरून बाजूला फेकले गेल्यामुळे गंभीर जखमी झाले. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांच्या मदतीने दोन्ही जखमींना तातडीने विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी तपासणीअंती किरण वंटणकर याला मृत घोषित केले.

# जिल्हा माहिती कार्यालयात उपसंपादकपदी चंद्रकांत कारभारी रुजू

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा माहिती कार्यालय नांदेड येथील उपसंपादकपदावर चंद्रकांत कारभारी आज रुजू झाले. हिंगोली येथून बदलीने त्यांची नांदेड येथे नियुक्ती झाली आहे. प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे यांनी त्यांचे स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने जारी केलेल्या आदेशानुसार यापूर्वी या पदावर कार्यरत असलेल्या उपसंपादक अलका पाटील यांची हिंगोली येथे बदली झाली आहे.

चंद्रकांत कारभारी हे यापूर्वी जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली येथे उपसंपादक म्हणून कार्यरत होते. तेथे त्यांनी राज्य शासनाच्या विविध योजना, उपक्रम तसेच विकासकामांच्या प्रसिद्धीचे काम प्रभावीपणे पार पाडले. नांदेड येथे रुजू झाल्यानंतर जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्ह्यात २५ ऑगस्टच्या सकाळी ६ वाजेपासून ते ८ सप्टेंबर २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २५ ऑगस्टच्या सकाळी ६ वाजेपासून ते ८ सप्टेंबर २०२६ रोजीच्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमूद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

# धनेगाव जिल्हा परिषद शाळेसाठी दोन वर्ग खोल्यांसह वॉटर फिल्टर व सुशोभीकरण करण्यासाठी प्रयत्नशील –आ. बोंढारकर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – धनेगाव जिल्हा परिषदे शाळेसाठी दोन वर्ग खोल्यांसह वॉटर फिल्सर व सुशोभीकरण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही आ. आनंद पाटील बोंढारकर यांनी दिली.



आ. बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने दक्षिण विभागात ११ हजार वृक्ष लावण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

तसेव विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. यात शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. यावेळी धनेगाव जिल्हा परिषद शाळेची अवस्था पाहून जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दोन वर्ग खोल्या बांधकाम करून देण्याचे व शुध्द पाणी वॉटर फिल्टर मिळावे यासाठी आश्वासन तर सुशोभीकरण व दुरुस्तीसाठी प्रयत्नशील असल्याचे आ. बोंढारकर यांनी सांगितले.

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने नांदेड दक्षिण तालुका प्रमुख उद्धव पाटील शिंदे यांच्या वतीने जिल्हा परिषद हायस्कूल धनेगाव येथे शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपण कार्यक्रमाचे २४ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी फटाक्यांची आतीषबाजी व लेझीम पथकाने स्वागत केले.

जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, तालुका प्रमुख उध्दव पाटील शिंदे, शिवसेनेचे सिडको शहरप्रमुख सुहास पाटील खराणे, नरेंद्र गायकवाड, सुदिन बागल, रवी थोरात, रमेश वाघमारे, भगवान कवाळे, मारोती शिंदे, दिगंबर शिंदे,प्रभाकर गायकवाड, रुपेश देशमुख प्रकाश शिंदे ,अनिल कवाळे, गौरव शिंदे, छोटू शिंदे, विठ्ठल शिंदे, आनंदा देशमुख अशोक शिंदे, मुन्ना देशपांडे, शिवराज कवाळे, मुख्याध्यापक शरद ढगे, गौरव शिंदे, भगवान कवाळे, मारोतराव शिंदे, शंकर भालके, केंद्रप्रमुख मठपती यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरीक उपस्थित होते.

# दुसऱ्या श्रावण सोमवारनिमित्ताने भाविकांनी घेतले तीर्थक्षेत्र काळेश्वर मंदिरात दर्शन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड शहरापासून जवळील लाखो भाविक-भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र काळेश्वर मंदिरात श्रावण मास दुसऱ्या सोमवार निमित्त २४ ऑगस्ट रोजी पंचक्रोशीतील हजारो भाविक-भक्तांनी दर्शन घेतले. यावेळी महादेवाचा गजर करत दर्शन रांगेत जय काळेश्वर भगवान की जय, बम बम बोले, हरहर महादेव कि जय आदी घोषणा देण्यात आल्या. रात्री १ ते ५ महाअभिषेक, संध्याकाळी गोदावरी माता व काळेश्वर आरती आयोजित केली होती. यानंतर सकाळपासून मोठ्या प्रमाणात हजारो भाविक-भक्तांनी दर्शन घेतले.

काळेश्वर मंदिर विश्वस्त समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रावण मास निमित्ताने दुसऱ्या सोमवारी २४ ऑगस्ट रोजी भाविक-भक्तांची दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी पाहता भाविकांची विशेष व्यवस्था करण्यात आली होती तर ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी मोठ्या प्रमाणात अधिकारी, पोलीस अमलदार, महिला पोलीस, होमगार्ड यांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. श्रावण महिन्यात पहिल्या सोमवारी २४ ऑगस्ट रोजी सकाळी विश्वस्त समिती पदाधिकारी यांच्या हस्ते व पुजारी रामेश्वर लिंगप्पा धणमणे स्वामी, सतीश धनमणे स्वामी, राम धनमणे यांच्या विधीवत व मंत्रोच्चाराने महाअभिषेक, महापूजा, महाआरती तर सायंकाळी गोदावरी माता नदीच्या काठावर महाआरती व काळेश्वर मंदिरात संध्याकाळी आरती आयोजित करण्यात आली होती व श्रावणमास निमित्ताने दैनंदिन दुपारपासून भाविक- भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. श्रावणमास महिनाभर व दुसऱ्या सोमवार निमित्ताने होणारी भाविक- भक्तांची गर्दी पाहता भाविक भक्तांसाठी पिण्याचे पाणी, दर्शन रांग यासह सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती तर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षकओमकांत चिंचोलकर यांच्या आदेशानुसार दोन पोलीस निरीक्षक, सपोनी, उपनिरीक्षक ११, पोलीस अंमलदार, महिला पोलीस कर्मचारी, ९० होमगार्ड, महिला होमगार्ड ६५ यांची नेमणूक करण्यात आली होती.



**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com